
७ जानेवारी १९६

चा ळी स पै




साप्ताहि

# माणू

कर्ट कीसींगर जर्मन राष्ट्राच्या पुनरुत्थानाची नांदी

आणि ड्रॅगन जागा झाला उत्तरार्ध

जे न देखे रवी

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९, नारायण पेठ, पुणे २





## एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : सत्ताविसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्रमैत्री

स. न. डिसें. २२

सदाशिव पेठकर यांचा दिवाळी अंकातला लेख वाचल्यापासून मी 'माणूस'चा नियमित वाचक झालो आहे.

पेठकरांचा दिवाळी अंकातील लेख फारच सुरेख उतरला आहे. त्यांच्या लेखणीतील चातुर्य व सुज्ञता मराठीत फारच दुर्मिळ आहे.

विनंती एवढीच की, पेठकरांचे सदर आपण नेहमीपेक्षा वाढवून देणे.

**दामोदर प्रभू, मुंबई.**

स. न. डिसें. २७

स्पष्ट लिहिल्याबद्दल क्षमा असावी. हल्लीचे 'माणूस' साप्ताहिकाचे अंक वाचले असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती म्हणजे 'माणूस'मधील माणूसपण नष्ट व्हावयास लागले आहे.

'माणूस' साप्ताहिक म्हणजे युद्ध-कथांचे माहेरघर, अशी माझी समजूत होती. 'माणूस'मधील काही उत्कृष्ट कथा, श्री. अरुण साधू यांची 'आणि ड्रॅगन जागा झाला,' अशोक खरे यांची 'ऑपरेशन सिसेरो', श्री. रा. म. शास्त्री यांची 'नाझी भस्मासुराचा उदयास्त', 'हंसा वाडकर यांची आत्मकथा' इ.

हल्ली 'माणूस'मधील युद्धकथा बंद झाल्या आहेत. लवकरच त्या पूर्वी-प्रमाणे येतील, अशी खात्रीपूर्वक आशा व्यक्त करतो.

**अनिल अभ्यंकर, मुंबई.**

# एक दुखणे तरी तूर्त पुढे गेले!

हुकुमसिंगांची मध्यस्थी यशस्वी ठरली आणि दिल्लीने सुटकेचा निःश्वास टाकला. संत फत्तेसिगांचे उपोषण ही केंद्र सरकारला मोठीच डोकेदुखी होऊन बसली होती. कारण या उपोषणानंतर त्यांनी आत्मदहनाच्या बेत जाहीर केला होता आणि या आत्मदहनाच्या कार्यक्रमात त्यांचे आठ सहकारीही भाग घेणार होते. त्यामुळे या उपोषणपर्वाचे दुःखान्त पर्यवसान झाले तर त्याचे परिणाम किती दूरगामी होतील, याची केंद्र सरकारला तशी जाणीव होती.

आणि म्हणूनच प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी फत्तेसिगांना उपोषण सोडण्याची चार वेळा विनंती केली. परंतु फत्तेसिंगांनी ती फेटाळून लावली. त्यांनी जेव्हा राष्ट्रपतींची विनंतीही धुडकावून लावली तेव्हा मात्र मामला गंभीर बनला. फत्तेसिंग आपल्या मागण्यांबाबत रेसभरही मागे सरण्यास तयार नव्हते. पंजाब आणि हरियाना या राज्यांसाठी राज्यपाल व वरिष्ठ न्यायालय स्वतंत्र असावे, ही सूचना उभय राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्यावरही चंदिगडबाबत फत्तेसिंग अडून बसले होते. चंदिगड आणि भाकडा प्रकल्प हे पंजाब सरकारच्या कक्षेखाली आले पाहिजेत हा त्यांचा हट्ट अखेरपर्यंत कायम होता.

याबाबत त्यांचे समाधान करणे केंद्र सरकारलाही सर्वस्वी अशक्य होते, म्हणूनच सर्व विवाद्य प्रश्न उभय राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी सोडवावेत अशी भूमिका नवे गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी राज्यसभेत जाहीर केली व याच भूमिकेचा इंदिरा गांधी यांनीही आपल्या मुलाखतीत पुनरुच्चार केला. या सर्व परिस्थितीमध्ये पंजाबचे मुख्यमंत्री ग्यानी गुरुमुखसिंग मुसाफिर यांच्यापुढे पेचप्रसंग निर्माण झाला. कारण अगदी अखेरच्या क्षणी मास्टर तारासिंग यांच्या गटानेही फत्तेसिंग गटाशी समझोता केला. या संयुक्त अकाली आघाडीला यशस्वी रीतीने तोंड देता आले नाही तर तोंडावर असलेल्या निवडणुकीमध्ये आपली परिस्थिती अतिशय बिकट होणार हे गुरुमुखसिंगांना आणि त्याच्या सहकारी मंत्र्यांना कळून चुकले होते. म्हणून संरक्षणमंत्री स्वर्णसिंग यांनी पुढाकार घेऊन फत्तेसिंगांना उपोषण सोडण्यास भाग



पाडावे, अशी गुरुमुखसिंगांनी सूचना केली. परंतु पंजाबमध्ये व विशेषतः अकाली शीख समाजामध्ये स्वर्णसिंगांचे फारसे वजन नसल्यामुळे त्यांची मध्यस्थी यशस्वी होणार नाही, असे गुरुमुखसिंगांना सांगण्यात आले. शेवटी ही जबाबदारी सर्वानुमते लोकसभेचे सभापती श्री. हुकुमसिंग यांच्यावर टाकण्यांत आली. त्यांची ही पहिली अमृतसर-वारी अयशस्वी ठरली. त्यामुळे यापुढे आपल्यावर अवलंबून राहू नका, असे त्यांनी गुरुमुखसिंगांना सांगितले. परंतु कोणत्या तरी स्वरूपात तडजोड घडवून आणल्याशिवाय चंदिगडला परतणे गुरुमुखसिंगांना सर्वस्वी अशक्य होते व म्हणून ते हुकुमसिंगांसमवेत दिल्लीला आले व चंदिगडच्या भवितव्याबाबत फेरविचार करू, एवढे आश्वासन हुकुमसिंगांमार्फत फत्तेसिंगांना द्यावे, असे त्यांनी इंदिरा गांधी यांना सुचविले.

गेल्या सोमवारी हुकुमसिंग पुन्हा अमृतसरला परतले तेव्हा तेथील वातावरण चांगलेच तंग होते. शहरभर संचारबंदी जारी होती म्हणून वातावरणातील तंगपणा प्रत्यक्ष दिसत नसला तरी त्याची धग जाणवत होती. ते सुवर्ण मंदिरात गेले तेव्हा फत्तेसिंगाच्या सहकाऱ्याची आत्मदहनाची पूर्वतयारी आटोपली होती. हुकुमसिंगाच्या मध्यस्थीला यश येते किंवा नाही यासंबंधी दिल्लीही साशंक होती. परंतु चंदिगडचा प्रश्न खुला आहे असे केंद्र सरकारच्या वतीने आपण सांगतो, असा हुकुमसिंगांनी खुलासा करताच फत्तेसिंगांनी उपोषण सोडण्यास व आत्मदहनाचा बेत रद्द करण्यास संमती दिली. हुकुमसिंगांचे आश्वासन मोघम स्वरूपाचे होते. परंतु यापुढे फार ताणण्यात अर्थ नाही, हे फत्तेसिंगांनी जाणले व हुकुमसिंगांच्या हातातून सरबताचा पेला घेऊन आपले उपोषण सोडले. त्याबरोबरच दिल्लीनेही सुटकेचा निःश्वास टाकला.

फत्तेसिंगांनी उपोषण सोडल्यानंतर त्यांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी नेमके काय करावयाचे याचा विचार सुरू झाला व पंजाब, हरियाना आणि हिमाचल प्रदेश यांच्या मुख्यमंत्र्यांची समिती नेमून या प्रादेशिक मागण्यांचा विचार करावा असे ठरले. या समितीचा निर्णय काय होईल, हे सांगणे जसे कठीण आहे, तसेच

या निर्णयावर फत्तेसिंगांचे समाधान होईल किंवा नाही हेही आज सांगता येत नाही. निवडणूक पार पडेपर्यंत हा प्रश्न किंवा स्पष्ट बोलावयाचे तर हे दुखणे पुढे ढकलले गेले एवढेच समाधान गृहखात्याच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. चंदिगडबाबत इंदिरा गांधी यांचा लवाद नेमण्यात आला आहे. तो प्रश्न कसा सोडवावयाचा याचेही स्पष्ट चित्र त्यांच्यासमोर उभे नाही. हरियानाला इतर काही सवलती देऊन चंदिगडवरचा अधिकार सोडण्यासाठी त्याला राजी एवढे करावयाचे एकच सूत्र त्यांना या बाबतीत स्वीकारता येईल. हरियानाला कोणत्या सवलती द्यावयाच्या यासंबंधीच प्रामुख्याने श्रीमती गांधी भगवत दयाल शर्मा यांच्याशी चर्चा करणार आहेत. अर्थात् हेही कार्य निवडणुकीच्या अगोदर होणार नाही. योगीराज सूर्यदेव यांनीही आपले उपोषण सोडले याला हेच कारण आहे. येत्या मार्चपर्यंत कोणताही बदल होणार नाही, असे हरियानाच्या महसूलमंत्र्यांनी आश्वासन दिल्यामुळे त्यांच्या हातातून पंचामृताचा पेला घेऊन योगीराजांनी आपल्या दहा दिवसांच्या उपोषणाची समाप्ती केली.

## गोवधबंदी–प्रश्न फक्त प्रतिष्ठेचा

पुरीच्या शंकराचार्यांचे व प्रभुदत्त ब्रह्मचाऱ्यांचे उपोषण मात्र अद्याप चालूच आहे. राष्ट्रपतींनी गोवधबंदीबाबत वटहुकूम काढला तरच आपण आपले उपोषण सोडू, अशी निग्रही भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. उपोषण सोडले तरच आपल्या विनंतीचा विचार करू, असे केंद्र सरकारने त्यांना कळवले आहे. दोघांच्याही दृष्टीने आता हा केवळ प्रतिष्ठेचा प्रश्न झाला आहे. उपोषणांपुढे दडपून जाऊन मागण्या मान्य करावयाच्या नाहीत हे केंद्र सरकारने आता ठरविले आहे, असे चव्हाणांनी यापूर्वीच जाहीर केले असून इंदिरा गांधी यांनीही तीच भूमिका कायम असल्याचे सांगितले आहे. राष्ट्रपतींची विनंतीही शंकराचार्यांनी फेटाळून लावली असल्यामुळे सरकारमार्फत यापुढे कोणतेही प्रयत्न होणार नाहीत. आता शंकराचार्यांच्या सल्लागारांनीच त्यांना उपोषण सोडण्यास भाग पाडावे. सरकारने आपल्या परीने सर्व प्रयत्न केले आहेत, असे तेथे सांगण्यात येते.

उपोषणांवरून निवडणुकीच्या राजकारणाकडे दृष्टी टाकली की तेथेही धुसफूस आणि वैयक्तिक प्रतिष्ठा यांनीच सारे वातावरण झाकाळून टाकल्याचे दिसून येते. मध्यवर्ती काँग्रेस निवडणूक समिती दररोज एकेका राज्याच्या यादीचा विचार करण्यात गढून गेली आहे. दक्षिणेकडच्या याद्या मंजूर करताना समितीला फारसा त्रास पडला नाही. परंतु उत्तरेकडच्या याद्यांचा विचार सुरू झाला तेव्हा अंतर्गत गटबाजीने काँग्रेस यंत्रणा केवढ्या मोठ्या प्रमाणावर पोखरली गेली आहे हे दिसून येते. खुद्द दिल्लीच्या यादीचा विचार चालू असताना दिल्ली प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष ब्रह्मप्रकाश मोगली सुलतानाप्रमाणे वागत आहेत, असे उद्‌गार इंदिरा गांधी यांनी काढले. मेहेरचंद खन्ना व श्यामनाथ या दोघा मंत्र्यांना ब्रह्मप्रकाशांनी आपल्या


यादीतून वगळले आहे. त्यांच्या नावांचा विचार व्हावा, असे इंदिरा गांधी यांनी सुचविताच " ते शक्य नाही " असे उत्तर देऊन ब्रह्मप्रकाश गप्प बसले. आपली भूमिका इंदिरा गांधींपुढे विशद करण्याचीदेखील त्यांना जरूरी वाटत नाही.

इतकेच नव्हे तर कमिटीत कामराज यांनी ब्रह्मप्रकाशांची बाजू घेऊन इंदिरा गांधी यांच्या उद्गारांसंबंधी नापसंती व्यक्त केली. मध्यवर्ती निवडणूक समितीची दररोजची बैठक वादंगाने गाजत आहे. या बैठकीच्या वेळी चर्चेत भाग घेत नाही अशी एकच व्यक्ती आहे आणि ती म्हणजे श्री. चव्हाण. मी इकडचा नाही व तिकचाही नाही, अशी भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. श्री. मेनन यांच्या उमेदवारीचा प्रश्न निघाला तेव्हाही त्यांनी मौनच पाळले होते व तेव्हापासून आतापर्यंत त्यांनी हे सोईस्कर मौन सोडलेले नाही. सत्तास्पर्धेच्या राजकारणात वरची पायरी गाठण्यासाठी आतापर्यंत त्यांना हीच अलिप्त वृत्ती उपयोगी पडली आहे. यापुढच्या पायऱ्या चढताना तिचाच आधार घेणे त्यांना उचित वाटत असावे.

मध्यवर्ती निवडणूक समितीच्या बैठकी चालू असतानाच कॉंग्रेस संघटनेला एकामागून एक असे धक्के बसत आहेत. राजस्थानमध्ये कुंभराम आर्य यांचा गट मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यानंतर कॉंग्रेस पक्षातूनही बाहेर पडला आहे. यामुळे राजस्थान विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे बहुमत नाहीसे झाले आहे. येत्या निवडणुकीपर्यंत असेच रेटावयाचे, असे मुख्यमंत्री श्री. मोहनलाल सुखाडिया यांनी जाहीर केल्यामुळे कॉंग्रेस श्रेष्ठींना हायसे वाटले. परंतु तेवढयात बिहारमधील पन्नास कॉंग्रेस आमदारांनी पक्षत्याग करून नवा विरोधी पक्ष स्थापन करण्याची गर्जना केली आहे. रामगडचे महाराज कामरूप नारायणसिंग व बिहार प्रदेश कॉंग्रेसचे भूतपूर्व अध्यक्ष महामायाप्रसाद सिन्हा यांनी या विरोधीपक्षाचे नेतृत्व करण्याचे ठरविले आहे. उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश या राज्यांतील दुफळी तर यापूर्वीच चव्हाटयावर आली आहे. पश्चिम बंगालमध्ये बंगला कॉंग्रेस तर ओरिसामध्ये हरेकृष्ण मेहताब यांची जनकॉंग्रेस या संघटनाही सत्तारूढ कॉंग्रेसबरोबर दोन हात करण्यास, सिद्ध झाल्या आहेत.

उत्तरेकडच्या या फाटाफुटीचा फायदा घेण्याच्या दृष्टीने स्वतंत्र पक्ष व जनसंघ या दोन पक्षांचे नेते वाटाघाटीत गुंतले असून या युतीला कसे तोंड द्यावयाचे: हाच मुख्यत: निवडणूकपूर्व काळातला कॉंग्रेसपुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. ●

**— सदाशिव पेठकर**



## निवडणुकीचे महाभारत

माजी संरक्षणमंत्री आज निराधार झाले आहेत. नेहरूमित्र कृष्ण मेनन यांनी काँग्रेस सोडली ! मेनन हे काँग्रेसमधले द्रोणाचार्य होते. नेहरुभक्तीच्या द्रोणात त्यांचा भारतातील नेतृत्व-मालिकेत जन्म झाला. धनिकांच्या महालापेक्षा गरिबांशी या द्रोणाचार्यांचे संधान होते. पुत्र अश्वत्थाम्याला पाण्यात कालवलेले पीठ तरी त्या द्रोणाचार्याला दूध म्हणून प्यायला देता येत असे. परंतु पीठ आणि पाण्याचे वाढते दुर्भिक्ष्य देशात पसरल्याने हे द्रोणाचार्य दुःखी झाले होते. यातच भर म्हणून मुंबापुरी द्रौपदीचे श्रीमंत दादा, द्रुपद सदोबा यांनी या द्रोणाचार्यांचा अपमान केला – "मूर्ख ब्राह्मणा, तुझी बुद्धी चळली आहे" – न दरिद्रो वसुमतो नाविद्वान्विदुषः सखा । याच शब्दांत त्यांना लोकसभेचे तिकीट नाकारले. द्रुपदाने केलेला अपमान द्रोणाचार्यांच्या वर्मी झोंबला आहे. द्रोणाचार्यांनी कौरवांचा पक्ष आज सोडला आहे.

आम्ही म्हणतो, झाले हे बरे झाले. मनाने पांडवांचे आणि विशेषतः, अर्जुनाचे पक्षपाती राहून कौरवांच्या सेवेत राहण्यापेक्षा हे द्रोणाचार्य एकदाचे उघडपणे प्रतिपक्षाला जाऊन मिळाले तर ते ठीकच होईल. आयुष्यभर दुर्योधनाला न्यायाने वागवण्याचा उपदेश करीत अर्थाचा दास होऊन राहिलेल्या द्रोणाचार्यांना केव्हाही दुर्योधन हेच ऐकवतो– " आपण यांना धन दिले. सन्मानाचे स्थान दिले. यांना मंत्री करून त्यांच्यावर विश्वास टाकला. पण असे असूनही हे शत्रूला फितुर ! यांना काळजी काय ती पांडवांची आणि त्या अर्जुनाची......! सतत आमचा तेजोभंग आणि त्यांच्या पराक्रमाचे कौतुक......!!"

यावरून कुणाची अशी समजूत होईल की, कौरव–पांडवांच्या या संसारात अखेर पांडवांचा जय होणार आहे, तर ती गोष्ट मात्र खरी नाही. कौरव शंभर आहेत– पांडव पाच आहेत. आणि जमाना लोकशाहीचा आहे.– कौरवांची 'मेजॉरिटी' आहेच. जे द्रोणाचार्य बाहेर पडले आहेत किंवा पडणार आहेत त्यांनी आमचा पक्ष खुशाल सोडावा. द्रौपदी आमची आहे. पाच वर्षे वस्त्रे पुरवणारा तो 'जनताजनार्दन' आमचा आहे. आमचा पक्ष सोडलेल्या या आचार्यांचे पांडवांपैकी




राजेंद्र गायकवाड

तरी कुणाशी जमणार आहे? हे सहावे पांडव होणार! खुशाल व्हा! लोकशाहीचा हा खेळ असा बहारीचा आहे की, जितके पांडव वाढतील तितके कौरव अधिक निवडून येतील!! शिवाय मेननचे तिकीट आम्ही बर्वे यांना दिले आहे. कारण बर्व्यांचे रक्त अधिक 'तरुण' आहे.

## □ इं. पि. को. ३०९ मुडदाबाद!

आपल्या देशात सध्या दोन प्रकारच्या माणसांनी मोठी समस्या निर्माण केली आहे. देशाच्या काही खेड्यांत अन्न नाही म्हणून लोक उपाशी आहेत, आणि शहरात असून काही लोक उपाशी आहेत! अन्नाचा तुटवडा म्हणून उपासमारीने जी हत्या

होते...... त्या 'लोकहत्ये'ला कुणीच जबाबदार नसते. कुणी जबाबदार असेलच तर अमेरिका व रशिया! अमेरिकेला भारताला किती गहू लागणार याचा अंदाज-देखील नीट घेता येऊ नये, याला काय म्हणावे? तेव्हा उपासमारीच्या लोक-हत्येला आपल्या देशातले लोक किंवा मंत्री कुणीच जबाबदार नसून याची सर्व जबाबदारी कोसिजीन व पोसिजीन यांच्यावर आहे! अन्न समोर असून कुणी मरू म्हणेल तर मात्र इं. पी. कोड ३०९ खाली सरकार त्याला मरू देत नाही. गोहत्या बंदीसाठी अन्न नाकारणाऱ्या मंडळींची याच कलमाखाली सरकार उचल-बांगडी करते. आत्महत्या करणाऱ्याला जगण्याची इच्छा नसते. याउलट उपास करणाऱ्या माणसाला जगण्याची इच्छा असते. आत्महत्या व इच्छामरण या दोन्ही गोष्टींना एकाच कलमात गोवून कसे चालेल? आत्महत्येचा हा एकच गुन्हा असा आहे की जो व्यवस्थित केला तर शिक्षा होत नाही. अर्धवट किंवा सावकाश करू पाहाल तर सरकार खटला भरते. साहित्यिक मंडळींत आत्म-हत्या फारच लोकप्रिय आहे. आंग्ल कादंबरीकार व्हर्जिनिया वूल्फ हिने नदीत उडी टाकून आत्महत्या केली. हेमिंग्वे याने शॉटगनने आपला अंत केला. सानेगुरुजींनी झोपेच्या गोळ्या घेतल्या व 'मृत्यूचे चुंबन' घेतले. ही या क्षेत्रातील अलीकडील काळातील नामांकित मंडळी. शिवाय दररोज वृत्तपत्रांतून 'मी जिवाला कंटाळून आत्महत्या करीत आहे," अशी चिठ्ठी ठेवून जाणाऱ्या असंख्य दुर्दैवी-जिवांच्या बाबतीत......" कोणी त्यांची किती गणती ठेवली असे?.., परंतु उपास करणाऱ्यांना आत्महत्येच्या आरोपाखाली सरकारने लगोलग पकडून बिचाऱ्यांचा उपास मोडणे ठीक नाही. यामुळे अन्नात होणारी बचत सरकार लक्षात घेत नाही. उपास करणारी मंडळी बहुश: देशभक्त नसली तरी सत्प्रवृत्त असतात. अन्नाच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होण्यासाठी जशी कॅनडा, ऑस्ट्रेलिया व अमेरिकेची भरपूर मदत आवश्यक आहे, त्याचप्रमाणे आपल्यापैकी अनेकांनी उपासाने अन्नाची बचत केली पाहिजे. भारतातील प्रत्येक माणसाचा 'आत्महत्या निर्देशांक' सरकारने वैद्यकीय तपासणी करून ठरवून द्यावा त्याशिवाय रेशनकार्डच देऊ नये! समजा, सदाशिव-रावांचा आत्महत्या निर्देशांक २१ आला तर महिन्यातून वीस दिवस सदाशिव-रावांनी उपास करणे हीदेखील देशसेवाच होणार आहे. नीट विचार केला तर गळफास लावून आत्महत्या करणारी मंडळीही मरतामरता देशसेवाच करत अस-तात. अन्नाचा प्रश्न त्या 'लूप'ने जसा सुटेल तितकाच त्या गळ्याभोवतालच्या 'लूप'नेही सुटेल. हिशेबाला खायचे एक तोंड कमी झाले हाच शेवटी अर्थ! कलम ३०९ हे आपल्या देशात तरी तूर्त फारसे उपयुक्त नाही. ज्या देशांत अन्नाची सुबत्ता आहे, जगण्यात आनंदीआनंद आहे, तिथे कलम ३०९ असले तरी चालेल. परंतु आपल्या देशात सरकारने या कलमाची अंमलबजावणी स्थगितच करावी. निदान उपास करणाऱ्यांना तरी हे कलम लावू नये. कलम ३०९ मुडदा—बाद!

## □ सरकारी नोकर वाचले

परवाची गोष्ट, एक अत्यंत दु:खी तरुण आम्हांला भेटला. तो सरकारी सेवक होता. सेवेच्या तृतीय श्रेणीत. वर्षाकाठी त्याला तीन-चारशे रुपयांचे फक्त कर्ज व्हावे, इतपत चांगले वेतन सरकार त्याला देत होते. परंतु यापूर्वी मला तो कधी दु:खी दिसला नव्हता. अर्थात या वेळी त्याला कष्टी पाहून, या राज्यात एवढं तरी दु:ख का असावं, या विचाराने आम्ही कष्टी झालो. त्याच्या निरुद्योगाचे व् दु:खाचे कारण विचारताच त्याने सांगितले–

"मी सरकारी सेवक आहे. इमानेइतबारे सरकारची नोकरी केल्यावर मला जो फावला वेळ मिळत असे, त्या काळात आजपर्यंत मी रा. स्व. संघाचे काम करत असे. परंतु सरकारने नुकतीच जी आज्ञा काढली, त्यामुळे मी तूर्त काहीही करत नाही. मी माझ्या अर्ध्या खाकी चड्ड्या भिकाऱ्यांना दिल्या. घरातली लाठी बंबात टाकली. आता या वेळाचे काय करावे हे समजत नाही म्हणून मी दु:खी आहे ! "

आम्ही त्याला म्हटले की, " त्या जातीय व भयानक संघटनेपासून तुला सरकारने वाचवले आहे. देशासंबंधी किंवा आपल्या हिंदुसमाजासंबंधी दिवसभरात काही विचार तुझ्या मनात येणे, या घातक गोष्टींमुळे तुझी जी अधोगती होत होती, तीपासून आता तू वाचला आहेस. तर तुझ्या कार्यालयातील इतर सेवक ज्या बंदी नसलेल्या संघटनांत जात असतील, तेथे आता तू दाखल हो ! "

यावर तो दु:खाने म्हणाला,– " इतर कुठल्याही संघटनांत कुणीही सरकारी सेवक जात नाही ! कारण इतर काही संघटना तूर्त जिवंतच नाहीत. फक्त सरकारचे मुसलमान सेवक दर शुक्रवारी कार्यालयाच्या वेळात नमाज पढायला जातात ! सरकारने त्यांची तशी खास सोय केली आहे ! "

या मूर्ख माणसाचे दु:ख कसे कमी करावे हे आम्हांला समजेना. आम्ही चिडून विचारले की, " सर्व तटस्थ सरकारी सेवक फावल्या वेळात करतात काय?" तेव्हा तो म्हणाला, " ते फावल्या वेळात संसार करतात. शिवाय कार्यालयात कुणाला वेतनवाढ मिळाली ? कुणाला वरची श्रेणी मिळाली ? कुठल्या साहेबावर कुठल्या महिला-सेविकेचे वजन आहे ? सेवकांत कोण कुठल्या मंत्र्याचा 'पाव्हणा' आहे ? कार्यालयात कोणी 'लूप' बसवून घेतले आहे ? सायराबानू, तसेच शर्मिला टागोरचे धर्मान्तर–अशा कितीतरी विलक्षण गुंतागुंतीच्या प्रश्नांचा ते सतत विचार करतात ! यात ज्यांना रस नसतो, ते पान, तंबाखू, भविष्य, सिनेमा किंवा पत्ते यांसाठी आपले जीवनसर्वस्व वेचतात ! "

या कर्तृत्ववान माणसांच्या जीवनाकडे हा मूर्ख दु:खी माणूस उपहासाने पाहत आहे हे आमच्या लक्षात आले व आम्ही त्याला चांगला फैलावर घेतला–

" जातीय संघटनेत जाण्यापेक्षा यातली कुठलीही गोष्ट करण्यात सरकारी सेव-

कांच्या आयुष्याचे कल्याण आहे ! राज्याचे मंत्री हे थोर देशसेवक व समाजसेवक असतात. देशासंबंधी व समाजासंबंधी ते २४ तास विचार करत असतात. सरकारी सेवकांनी उगाच तास-दोन तास समाजसेवा करणे हा सेवावृत्तीचा अपमान होय ! सरकारी सेवकांचे मन हे सिगरेटीच्या धुरासारखे हलके, चहाच्या पाण्यासारखे पातळ व व्यसनाधीन माणसासारखे 'सुन्न' असावे ! समाजरचनेची स्फूर्ती वगैरे घेण्यासाठीही त्याने कुठे जाऊ नये म्हणून तर आपल्या देशाच्या थोर थोर नेत्यांची चित्रे कार्यालयात लटकवलेली आहेत."

अशी कानउघाडणी केल्यानंतर तो मूर्ख माणूस निघून गेला. परंतु आमची सरकारला अशी सूचना आहे, की कदाचित कार्यालयात टांगलेल्या या थोर पुरुषांच्या दर्शनानेच काही सरकारी सेवकांत अशा समाजसेवेच्या विकृती पसरत असाव्यात. तेव्हा सरकारी कार्यालयात, या थोर पुरुषांच्या ऐवजी, "चाळीस वर्षे एकही दिवस रजा न घेता निवृत्त झालेले अव्वल कारकून सेवाभूषण श्री. साहेबराव डिंक," "लूपच्या उपयोगाने आपला संसार तुटपुंज्या पगारात उत्तम ठेवणारे लूपभूषण श्री. प्रसन्नकुमार दशपुत्रे", "निवृत्तीच्या वेळी केवळ हजार रुपये पगार असताना काटकसरीने लाखलाखाचे चार बंगले बांधणारे बांधकाम-अधीक्षक श्री. सरपटवार," अशा थोर-सेवकांची चित्रे लावावी. यामुळे सर्व सरकारी सेवकांना आपल्या विश्वातील थोर पुरुषांची सतत आठवण राहील व जातीय संघटनेकडे ते कधीही वळणार नाहीत ! असे असंख्य थोर सरकारी सेवक तूर्त सेवेत आहेतच !

—ग्यानबा

## बहुदा यांनासुद्धा........

मंदा, कुठं गेल्ये होत्ये, म्हणून काय विचारतेस ? अग आज, यांचा पगार झाला होता ना ? मग ! म्हणून गेले होते बाजारात.

मला बाजारामध्ये आवडली लेस. पण बाई माझे सारे परकर विटलेले. मग परकरासाठी कापड घेतलं. मग पाठोपाठ एक साडीपण घेतली !

मग साडीला मॅचिंग ब्लाऊजपीसही घेणं भाग पडलंच आणि मग त्याला मॅचिंग बांगड्या आल्याच. हो तशीच पर्स व रिबीनसुद्धा.

अग पण मंदे, मी आता ह्या सर्वांमुळं अशी दिसेन म्हणतेस, की, मला मॅच होण्यासाठी आमच्या यांनासुद्धा बहुदा चेंज करावं लागणार आहे ! !

— विनायक व्हनबट्टे

# मतं जायची तिथेच जाणार

(काँग्रेसचे एक उच्चभ्रू माजी आमदार. वय सुमारे पंचावन्न. सध्या व्यवसाय पेन्शन).

माजी आमदार : (रागारागाने) कोण म्हणतंय काँग्रेस फेल्युअर झाली आहे म्हणून. काही म्हणायला जागा आहे का ?

मी : पण......पण......तसा विरोधी पक्षांचा आरोप आहे. गेल्या वीस वर्षांत काँग्रेसच्या राजवटीनं काहीच साधलं नाही असं त्यांचं...

आ. : काहीच साधलं नाही ? अरे, आहे काय हे ? हा सत्याचा विपर्यास आहे. विरोधी पक्षांना नुसतं काँग्रेस अकार्यक्षम, काँग्रेस भ्रष्टाचारी असं म्हणायला ठीक जातं. पण कोणत्या एका विरोधी पक्षानं एखादी तरी मोठी संघटना व्यवस्थित चालवून दाखविली आहे का ? एखादं तरी भरीव कार्य केलं आहे का ? अरे, यांना नुसते आपले मोर्चे आणि चळवळीचे कार्यक्रम बरोबर पार पाडता येत नाहीत अन् हे म्हणे राज्य करणार! काँग्रेस अकार्यक्षम आहे असे ठोकून देणार...

मी : पण विरोधी पक्षांवर नुसती टीका करून त्यांच्या आरोपांना उत्तर दिल्यासारखं होत नाही. बोला, काँग्रेस अकार्यक्षम नाही हे तुम्ही कसं पटवून देऊ शकता ?

आ. : उघड आहे. गेल्या वीस वर्षांचा भारताचा इतिहास पाहा आणि इतर जगाकडे नजर टाका. कुठल्या नवजात देशात एवढी शुद्ध लोकशाही टिकून राहिली आहे ? कुठे...

मी : शुद्ध लोकशाही ? एकपक्षीय हुकूमशाही...

आ. : तो आमचा दोष नाही–विरोधीयांच्या नालायकीचा तो परिणाम आहे...आणि हुकूमशाही या शब्दाला माझा सक्त विरोध आहे. काँग्रेससारखी सर्व विचारांना, सर्व तत्त्वांना समान स्थान असलेली दुसरी राजकीय संघटना नाही. काँग्रेसच्या ऐवजी सोशॅलिस्ट, जनसंघ, कम्युनिस्ट कुणीही येऊ द्यात राज्यावर–इतक्यात येणारच नाहीत म्हणा– म्हणजे कळेल खरी पक्षीय हुकूमशाही कशी असते ते. खरेच सांगतो, लोकशाहीची खरी आंतरिक तळमळ असलेला काँग्रेस हाच एक पक्ष भारतात आहे आणि कार्यक्षमतेविषयी म्हणाल तर तो आपल्या दृष्टीचा प्रश्न

आहे. गेल्या वीस वर्षांत आम्ही काय काय केलं हे तुम्ही न पाहता काय केलं नाही याचाच तुम्ही सतत मंत्र म्हणत बसला तर कसं होईल ?...

मी : केलंय तरी काय ?

आ. : हाही सापेक्षी विषय आहे. घरणं, रस्ते, वीज अशा मोठ्या गोष्टी मी सांगत बसत नाही. पण थोडक्यात सांगतो. वीस वर्षांपूर्वीचं आठवा. आजूबाजूची माणसं कपडे कशी घालत होती, काय खातपीत होती, त्यांची चैनीची साधनं काय होती आणि आताचं चित्र बघा म्हणजे कळेल. देशातील लोकांची आर्थिक भरभराट किती झाली आहे ती.

मी : अहो, वाढलेल्या किंमती....

आ. : हो. त्यांचा बागुलबोवा दाखवू नका.... त्याच प्रमाणात उत्पन्नही वाढलं आहे आणि खर्चही वाढला आहे. वीस वर्षांपूर्वी तुम्ही चैनीवर आणि सुखासीनतेवर जेवढा खर्च करीत होता त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात आता करताहात. अन्नावरील खर्च आणि चैनीवरील खर्च यांचं प्रमाण वीस व र्षांपूर्वी जेवढं होतं त्यापेक्षा कितीतरी पटीनं आता वाढलं आहे. आणि म्हणून तुम्ही म्हणता अन्न महागलंय. अहो, तुमच्या गरजा वाढल्यायत आणि सुखासीनता वाढली आहे हे सांगा. आणि गरजा वाढणं हे भरभराटीचं लक्षण नव्हे काय?

मी : चैनीवरील खर्च म्हणजे तरी काय ?

आ. : फार सांगत नाही. एकच उदाहरण सांगतो. माझं वय आता पंचावन्न असेल. मी प्रायमरी शाळेत लंगोटी घालून जात असे. शाळेत असताना धोतर आणि सदऱ्याची एक जोडी असे. कॉलेजमध्ये गेल्यावर आणखी एक कोट. आता तुम्हीच सांगा. मध्यमवर्गीय कुटुंबातल्या प्रायमरी शाळेत जाणाऱ्या मुलाला किती प्रकारचे कपडे असतात ?

मी : हे पटत नाही बुवा. तुम्ही गल्लत करता आहात— समाजातल्या काही थरांची होत असेल अशी भरभराट, पण काही थर खालीच जाताहेत— विषमता वाढते आहे.

आ. : पुन्हा तेच. सापेक्षी विषय आहे. समाजातला कोणताही थर वीस वर्षांपूर्वी जेवढा खाली गेला होता त्यापेक्षा आता वरच आलेला आहे. खाली मुळीच नाही. हां. एक शक्य आहे. वेगवेगळ्या थरांतले आर्थिक अंतर कमी व्हायला अजून वेळ आहे. पण ते कमी होत आहे हे निश्चित.

मी : हे सर्व पुराव्याशिवाय....

आ. : आणि तुम्ही आरोप करता ते तरी कोणत्या पुराव्यावर ? जे दिसते ते नीट तपासा: म्हणजे पटेल. भ्रष्टाचाराचे जे आरोप तुम्ही काँग्रेसवर करता त्याला तरी काय पुरावा असतो हो ? आणि मी म्हणतो— हो कबूल. आहे काँग्रेसमध्ये भ्रष्टाचार. साखरेच्या भोवती मुंग्या येणारच. कोठल्याही देशात बघा. राज्यकर्ते नेहमीच भ्रष्टाचाराने वजबजलेले असतात. त्यातल्या त्यात कोण संयम राखतो आणि कोण आधाशीपणा करतो हे बघायला हवे. मी म्हणतो इतर देशांतल्या भ्रष्टाचारांच्या प्रमाणात आपला देश अतिशय सोज्वळ,

सालस आहे वघा. आजूबाजूला बघा. लोकशाहीचा तुमचा आदर्श असलेलं अमेरिका बघा. तिथल्या भ्रष्टाचाराच्या आणि लाचलुचपतीच्या एकेक कथा ऐकल्या तर झीट येऊन पडाल.

मी : हे काही पटत नाही बोवा–

आ. : न पटो. ज्यांना गेल्या वीस वर्षांतल्या काँग्रेस राजवटीचा खरोखरच लाभ झालेला आहे त्यांना हे पटतं. असंतोष–असंतोष असा आपण कितीही आरडाओरडा केला तरी तो आवाज शहरांच्या बाहेर फारसा जात नाही. आणि मग मतं जातात बैलजोडीलाच. हे सत्य तर तुम्ही नाकबूल करू शकणार नाही......

●

## बिहार
# काँग्रेसला हमखास यश

बिहारमध्ये खरी चुरस आहे ती काँग्रेस आणि विरोधी पक्ष यांच्यांत नव्हे, तर काँग्रेसचा एक गट आणि दुसरा गट अशी ही चुरस आहे. भयानक दुष्काळाने बिहारला ग्रासले आहे. बिहार नेहमीच अधून मधून अशा दुष्काळाच्या तडाख्यात सापडत असतो. सुमारे ५ कोटींची घनदाट लोकवस्ती असलेल्या या राज्याची जमीन गंगेच्या पाण्याने कितीही सुपीक झाली असली तरी एखाद्या वर्षी जरी पावसाने दगा दिला तरी एकदम राज्यातला मोठा भाग दुष्काळात लोटला जातो.

यंदा त्या दुष्काळात भर म्हणूनच की काय बिहारात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी चळवळीचा कहर केला आहे. ठिकठिकाणी गोळीबारांना ऊत आला होता. थोडक्यात म्हणजे राज्यकर्त्यांविषयी विशेष आस्था वाटण्यासारखे बिहारमध्ये काही उरलेले नाही. आणि तरीही येत्या सार्वत्रिक निवडणुकीत बिहारमध्ये काँग्रेसला काहीही धोका नाही. कारण उघड आहे. एकही जबरदस्त विरोधी पक्ष काँग्रेसला तोंड द्यायला नाही. आणि एकाही विरोधी पक्षाची मुळे दरिद्री बिहारी शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोचलेली नाहीत. आणि म्हणूनच बिहारमध्ये चुरस आहे ती काँग्रेस आणि विरोधी पक्ष अशी नाही तर काँग्रेसचा राज्यकर्ता गट आणि विरोधी गट अशी.

विधानसभेतील ३१८ जागांपैकी सध्या काँग्रेसच्या ताब्यात २६२ जागा आहेत. १९६२ च्या निवडणुका झाल्या तेव्हा काँग्रेसने वास्तविक पाहता १८२ जागाच जिंकल्या होत्या. पण सत्तेकडे माणसे आकर्षिली जातात. गेल्या पाच वर्षांत विरोधी पक्षातले आणि अपक्ष असे ऐंशी उमेदवार काँग्रेसला येऊन मिळाले. त्यामुळे गेल्या निवडणुकीनंतर स्वतंत्र पक्षाची बिहार विधानसभेतील उमेदवारांची संख्या ५० वरून शून्यावर आली. प्रजासोशॅलिस्ट आणि सोशॅलिस्ट मिळून ३६ उमेदवार होते ते आता प्रजा सोशॅलिस्ट ८ आणि संयुक्त सोशॅलिस्ट १७ असे झाले. कम्युनिस्टांचे

बारा उमेदवार स्थिर राहिले. जनसंघाने दरम्यान एक पोटनिवडणूक जिंकून आणि एका अपक्षाला आपल्या जाळयात खेचून आपली संख्या तिनांची पाचांवर नेली. अपक्षांची संख्या १२ वरून २ वर उतरली.

विरोधकांमध्ये अशी गळती लागल्यानंतर सत्तेला काहीही धोका न उरल्याने काँग्रेसमधल्या अंतर्गत सत्तास्पर्धांना चांगलाच ऊत आला. मुख्यमंत्री श्री. के. बी. सहाय यांच्याविरुद्ध पूर्वीचे मुख्यमंत्री श्री. बी. एन्. झा, सध्याचे शिक्षण मंत्री श्री. एस्. एन्. सिन्हा आणि पाटबंधारे मंत्री श्री. एम्. पी. सिन्हा यांचा एक जबरदस्त गट हात धुऊन मागे लागला आहे. श्री. सहाय यांच्यावर विरोधी पक्षीयांनी आतापर्यंत भ्रष्टाचाराचे, लाचलुचपतीचे अनेक आरोप केलेले आहेत. त्यांचाही हा झा गट चांगला उपयोग करून घेत आहे.

या सर्वांचा परिणाम म्हणून या गटाने नुकताच सहाय गटाला आणि काँग्रेसला एक जबरदस्त तडाखा दिला आहे. श्री. झा यांच्या सुमारे ८०० काँग्रेस अनुयायांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला असून त्यामध्ये ५० आमदारही आहेत. रामगडचे राजे के. एन्. सिंह यांनी या बाबतीत पुढाकार घेतला आहे. या राजीनामा प्रकरणामुळे काँग्रेसला चांगलाच हादरा बसला असला तरी त्यामुळे बिहार विधानसभेतील काँग्रेसच्या बहुमताला विशेष धक्का पोचणार नाही. प्रचंड बहुमत होते ते थोडे कमी


# माणूस

साप्ताहिकासाठी खालील गावी एजंटस् नेमणे आहेत.
चौकशी करावी.

**जिल्हा रत्नागिरी**
**१. सावंतवाडी**

**जिल्हा सांगली**
**१. जत २. शिराळा**

**जिल्हा सोलापूर**
**१. सांगोला २. अक्कलकोट ३. मंगळवेढा**
**४. माढा ५. करमाळा**

येईल एवढेच. मागील निवडणुकीत नाहीतरी काँग्रेसला ३१८ पैकी फक्त १८२ च जागा मिळाल्या होत्या. निवडणूक झाल्यानंतर मग काँग्रेसचे बहुमत एवढे वाढले. पण या सर्व प्रकरणांत फायदा कुणाचा झाला असेल तर तो मुख्यमंत्री श्री. सहाय यांचा. पक्षातील त्यांचे प्रतिस्पर्धी आपोआपच बाहेर फेकले गेले आहेत.

बिहारमधील निवडणुकांत आणि राजकारणात जात हा महत्त्वाचा घटक आहे. ब्राह्मण–ब्राह्मणेतर हा भेद बिहारमधील राजकारणातही आहे. राजकारणाच्या वरच्या स्तरांत अधिक. त्यामुळे ब्राह्मणेतरांची अधिक मर्जी कोण सांभाळतो यांवरही बरेच अवलंबून असते. काँग्रेसमधल्या सहाय आणि झा या दोन गटांनी आपापल्या निवडणूक उमेदवारांच्या याद्या दिल्लीला काँग्रेसच्या मध्यवर्ती निवड समितीकडे पाठविल्या त्यांमध्येही या जातीयतेचे प्रतिबिंब चक्क उठून दिसते. सहाय गटाने आपल्या यादीत ब्राह्मणांना ३६ जागा दिलेल्या आहेत तर झा गटाने आपल्या यादीत ब्राह्मणांना फक्त २२ च जागा दिल्या आहेत. स्वतः झा हे ब्राह्मण आहेत. त्यामुळे आपल्या गटात ब्राह्मणांचे तसे वर्चस्व नाही हे दाखविण्याचा हा प्रयत्न.

तिकिटांसाठी काँग्रेसमध्ये अशा निकराच्या मारामाऱ्या चालू असताना दरम्यान बिहारमधील दुष्काळ अधिकाधिक भीषण स्वरूप धारण करीत आहे. भूकबळी पडताहेत. विरोधी पक्ष काँग्रेसविरुद्ध रान उठविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण त्याचा विशेष उपयोग नाही. येत्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणता विरोधी पक्ष एक-दोन जागा अधिक कमावितो किंवा गमावितो हेच पाहायचे. विरोधी पक्षांच्या वाटाघाटी अद्याप पूर्ण व्हावयाच्या आहेत. विरोधी पक्षांनी कितीही प्रयत्न केले तरी बिहार विधानसभेतील त्यांच्या उमेदवारांची एकूण संख्या शंभराच्यावर जाणार नाही असे आताचे साधारण चित्र आहे. त्यातल्या त्यात संयुक्त समाजवादी पक्ष आणि जनसंघ या दोन पक्षांनी गेल्या पाच वर्षांत राज्यात थोडी ताकद कमावली आहे. ते आपले बळ विधानसभेत थोडफार प्रमाणांत वाढवू शकतील.

बिहारमधील दुष्काळ आणि निवडणुकांच्या संदर्भात कलकत्त्याच्या ‘ अमृतबझार पत्रिके 'त एक मोठे खोचक व्यंगचित्र आले होते. बिहारच्या दुष्काळपीडित वैराण जमिनीवर पांढरी टोपी घातलेली दोन काटेरी निवडुंगाची झुडपे आपापसात " तिकीट तिकीट " म्हणून गुद्दागुद्दी करताहेत असे ते चित्र होते. बिहारमधील एकूणच साऱ्या राजकारणाचे आणि भौतिक परिस्थितीचे चपखल वर्णन तेवढ्या चित्रद्वारा त्या चित्रकाराने साधले होते. ●



## विचारवारे

— समीर

### ☐ भारताला " लोकरक्षक " हवा

सरकारी यंत्रणेत भ्रष्टाचार माजला की नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली होते व " राजाने ताडले अन् पावसाने झोडले तर कुणाकडे फिर्याद करायची ? " असा सामान्य जनतेला प्रश्न पडतो. आपल्या सरकारने सध्या शासन–यंत्रणेच्या शुद्धीकरणासाठी एक ' सुधारणा समिती ' नेमली आहे व इतर अनेक विचारवंतही या समस्येचा ऊहापोह करीत आहेत. या मंडळींची एक सूचना वरचेवर ऐकू येत असते व ती म्हणजे सरकारी दडपशाहीविरुद्ध जनतेच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी ऑम्बड्स्मन ' म्हणजे ' लोकरक्षक ' नेमण्यात यावा. ऑस्ट्रेलियाचे ऑम्बड्स्मन जॉन बूथ परवा डेन्मार्कला जाताना दिल्लीला थांबले होते तेव्हा त्यांनी या चर्चेत स्वानुभवाची भर घातली.

त्यांच्या मते ब्रिटिश न्यायदानपद्धती वापरणाऱ्या सर्व देशांत ऑम्बड्स्मन ही संस्था उपयुक्त ठरेल. ऑम्बड्स्मन हा वास्तविक सुशासनाचा पाठीराखा असतो, तेव्हा सरकारने त्याला घाबरण्याचे कारण नाही. कॉमन्वेल्थमधल्या देशांची अशी आत्मप्रौढीची समजूत आहे, की आपली न्यायदानपद्धती निर्दोष आहे, त्यामुळे या देशांत यंत्रणेची विशेष आवश्यकता आहे. इंग्लंड व ऑस्ट्रेलियातले सरकार हे राजाचा प्रतिनिधी म्हणून सत्ता चालवीत असते, त्यामुळे एखादे वेळी सरकारी निर्णयामुळे नागरिकाच्या हक्कांचे उल्लंघन झाले तर त्याला थेट राजाच्या विरुद्ध फिर्याद करण्याची विचित्र परिस्थिती निर्माण होते. त्याचप्रमाणे या देशांत शेकडो लहानसहान संस्था अशा आहेत की त्या सरकार-निर्मित आहेत व त्यांना स्वायत्तता देण्यात आली आहे. त्यामुळे त्या सरकारलाही जबाबदार नाहीत व जनतेलाही जबाबदार नाहीत. अशा परिस्थितीत ऑम्बड्स्मन हा लोकांच्या हक्कांचा रक्षक या नात्याने तपासणीचे व फिर्यादीचे काम करू शकतो.

ऑस्ट्रेलियात ऑम्बड्स्मनचा प्रयोग यशस्वी होत आहे. कारण सरकार व जनता दोघांचाही त्याला चांगला पाठिंबा आहे. जनतेतर्फे तर काही वेळा आठवड्याला साठ तक्रारी येतात. उलटपक्षी, ऑम्बड्स्मनची नेमणूक पार्लमेंटतर्फे झाली नसूनही सरकारने त्याला अनधिकृत मान्यता दिली आहे. याचा पुरावा म्हणजे पार्लमेंटचे सदस्य, काही मंत्री व प्रत्यक्ष सॉलिसिटर–जनरलही त्याच्याकडे प्रकरणे पाठवतात.

## □ आधुनिक विश्वरूपदर्शन

इतर देशांची 'चक्षुर्वै सत्यम्' माहिती करून घेण्यासाठी व त्याच पद्धतीने आपली माहिती जगाला करून देण्यासाठी 'अवकाशयुगा'त पदार्पण करण्याची तयारी आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यासाठी "एबीसी इंटरनॅशनल टेलिव्हिजन" या अमेरिकन चित्रवाणी संस्थेचे अध्यक्ष डोनाल्ड कॉइल हे नुकतेच दिल्लीला येऊन गेले. त्यांनी "विश्वदर्शन" ('वर्ल्ड-व्हिजन') नावाच्या एका कार्यक्रमाची रूपरेषा पुढे मांडली व म्हटले, या कार्यक्रमात सध्या २६ देश सहभागी झाले असून भारतालाही सामील होण्याचे आमंत्रण देण्यात आले आहे. हा कार्यक्रम 'टेलस्टार' या कृत्रिम उपग्रहाच्या द्वारे चित्रक्षेपित करण्यात येणार आहे व त्यात प्रत्येक सदस्य देश आपले जीवन चित्रीत करणारा कार्यक्रम दाखवील. इतर देशांनी तो 'टेलस्टार'वरून आपल्या टेलिव्हिजनवर चित्रित करायचा अशी ही योजना आहे. म्हणजे भारताला दुसऱ्या देशाचे कार्यक्रम आपल्या टेलिव्हिजनअर दाखवावे लागतील; उलट आपले कार्यक्रम टेलस्टारला पाठविता येतील व तेथून ते दुसऱ्या देशांत जातील.

भारताला आपल्या सद्यःकालीन जीवनाचे कोणते पैलू परदेशीयांसाठी रंगवावेसे वाटतात हे पाहून त्याप्रमाणे खास चित्रवाणी कार्यक्रम तयार करता येतील. त्याप्रमाणे आपल्याकडे कोणते कार्यक्रम आवडतील हे पाहून परदेशचे कार्यक्रम तयार होऊ शकतील. पण सध्या हे "विश्व-दर्शन मंडळ" अशा खास विनंत्या करीत अथवा स्वीकारीत नाही. सध्या फक्त चित्र दर्शनाचा काळ ठरवून देण्यात आला आहे. उदाहरणार्थ, अर्जेंटिनाचा कार्यक्रम आठवड्यातून २१ तास दाखविण्यात येतो.

बुद्धी आणि कल्पकता वापरून असा कार्यक्रम तयार केला तर परकीयांना आपल्या देशापुढील समस्यांची प्रत्यक्ष व प्रखर जाणीव करून देता येईल. सध्या भारताचे अनेक विषयावरचे मत इतरांना माहीत तरी नसते किंवा पटलेले तरी नसते. ही परिस्थिती बदलता येईल. टेलिव्हिजन हा "दृष्टी ध्वनीन आणि मती"चा आकर्षक संगम आहे, त्यामुळे टेलिव्हिजनद्वारा परकीयांच्या घरात आपण आपल्या देशाचे जिवंत, चालतं-बोलतं चित्र उभे करू शकू. अमेरिकेत प्रत्येक नागरिक दिवसातून साडे पाच तास टेलीव्हिजन पाहत असतो. एवढ्या वेळात त्याला आपल्या देशाचे केवढे तरी ज्ञान करून देता येईल.

# कर्ट कीसींगर



जर्मन लोकांची आणि जर्मन राष्ट्राची साऱ्याच पाश्चात्यांना, अमेरिकन, युरोपियन आणि रशियनांनाही नेहमीच एक अनामिक भीती वाटत आली आहे. पहिल्या महायुद्धापूर्वीही ही भीती होतीच. त्यानंतर ती वाढली आणि दुसऱ्या महायुद्धानंतर तर जर्मन लोकांविषयी साऱ्या जगात अत्यंत तिरस्कार आणि भीती वाढीला लागली. जर्मन लोक पुन्हा डोके वर काढून जगाला केव्हा तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटतील, याची शाश्वती नाही. तेव्हा त्यांना सतत नतमस्तकच ठेवले पाहिजे, त्यांना वर येऊ देता कामा नये, या बाबतीत अमेरिका आणि रशिया ह्या दोघांचीही एकवाक्यता आहे. आणि जेव्हा जेव्हा जर्मनांची अस्मिता जागी होण्याची चिन्हे दिसू लागतात, नव्या ईर्ष्येने जागतिक राजकारणात भाग घेण्याचे प्रयत्न जर्मन लोक करू लागतात, तेव्हा तेव्हा सर्वत्र एकच खळबळ उडते आणि सारे जग जर्मनांच्या हालचालींकडे संशयग्रस्त नजरेने पाहू लागते.

पाश्चात्य राजकीय जगातच मंद खळबळ उडविणारी अशीच एक घटना नुकतीच पश्चिम जर्मनीत घडली आहे. भारतीय वृत्तपत्रांनी जरी या घटनेची विशेष दखल घेतली नसली तरी जर्मनीतील या हालचालींचे परिणाम दूरवर होतील, हे निश्चित. अनेक मूलभूत तत्त्वांचा या निमित्ताने पुनर्विचार होणार आहे.

पश्चिम जर्मनीत घडलेल्या या घटनांचे दोन भाग आहेत. बाहेरच्या जगात भीती आणि संशय निर्माण करणारी घटना म्हणजे पश्चिम जर्मनीतील ' नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टी ' या नाझी विचारसरणीच्या पक्षाला लाभत असलेली वाढती

# जर्मन

# पुनरुत्थानाची नांदी

लोकप्रियता आणि पक्षीय राजकारणाच्या मूलभूत तत्त्वांनाच धक्का देणारी दुसरी घटना म्हणजे पश्चिम जर्मनीतील ख्रिश्चन डेमोक्रॅट आणि सोशल डेमोक्रॅट या, गेली कित्येक वर्षे परस्परांचे शत्रू असणाऱ्या दोन पक्षांनी स्थिर सरकार टिकविण्यासाठी केलेली अभूतपूर्व हातमिळवणी. या दोन घटनांचे तसे परस्परसंबंध नाहीत. पण आणखी विशेष चर्चा होणारी एक गोष्ट म्हणजे पश्चिम जर्मनीच्या नव्या सरकारचे नवे चॅन्सेलर कर्ट कीसींगर हे पूर्वीचे नाझी पक्षाचे सभासद होते ही होय. अँग्लो–अमेरिकनांना बुचकळ्यात टाकणाऱ्या या घटनांनी साऱ्याच जगात चर्चेची फेर धरली आहे.

आपल्याकडची लोकसभा तसे पश्चिम जर्मनीचे ' बुंडेस्टॅग. ' परंतु जर्मनी राज्य घटनेप्रमाणे बुंडेस्टॅगसाठी सरळ निवडणुका न होता एखाद्या राजकीय पक्षाला किती टक्के मते पडतात त्या प्रमाणात त्या पक्षाचे सभासद बुंडेस्टॅगवर पाठविले जातात. आणि ज्या पक्षाला एकूण लोकमताच्या ५ टक्क्यांच्यावर मते पडतात तोच पक्ष बुंडेस्टॅगमध्ये प्रतिनिधित्व करू शकतो. या घटनेनुसार सध्या पश्चिम जर्मनीच्या बुंडेस्टॅगमध्ये तीनच पक्षांचे प्रतिनिधी आहेत. ख्रिश्चन डेमोक्रॅट, सोशल डेमोक्रॅट आणि फ्री डेमाक्रॅट.

## नाझी विचारांची वाढती लोकप्रियता

नॅशनल डेमोक्रॅटिक पक्षाला यामध्ये अद्याप प्रतिनिधित्व मिळाले नाही. कारण पक्षाची स्थापना होऊनच अवघी दोन वर्षे झाली आहेत आणि सुमारे वर्षापूर्वी

झालेल्या निवडणुकीमध्ये या पक्षाला पुरेशी टक्केवारी पडली नव्हती. पण पश्चिम जर्मनीतील बव्हेरिया आणि हेस या दोन राज्यांत नुकत्याच ज्या निवडणुका झाल्या, त्यांमध्ये या पक्षाला साडेसात टक्क्यांच्या वर मते मिळाली आहेत, आणि मागील वर्षीच्या निवडणुकांत या राज्यांमध्ये याच पक्षाला जी टक्केवारी मिळाली होती त्याच्या तिप्पट ही टक्केवारी आहे. या पक्षाची ही वाढती लोकप्रियता साहजिकच जर्मनीबाहेर शंकेचे वातावरण निर्माण करीत आहे.

ख्रिश्चन डेमाक्रॅट्स् आणि सोशल डेमोक्रॅट्स् या दोन टोकांच्या पक्षांची हातमिळवणी हीही जर्मन राजकारणातील एक अभूतपूर्व अशी घटना आहे. आतापर्यंत ख्रिश्चन डेमोक्रॅट आणि फ्री डेमोक्रॅट यांची हातमिळवणी होती. गेल्या पंधरा वर्षांत अक्षरश: राखेतून पश्चिम जर्मनी उभा राहिला. आर्थिक स्थैर्य त्याने प्राप्त केले आणि अमेरिकेच्या खालोखाल आपला व्यापार वाढविला. पण एवढे असूनही जर्मनीला जागतिक राजकारणात अद्यापही मानहानीच सहन करावी लागते. जर्मनीला गरज नसतानाही दरवर्षी अमेरिकेकडून कोटयवधी रुपयांचा माल आणि शस्त्रास्त्रे विकत घ्यावी लागतात आणि याचा जर्मन अर्थव्यवस्थेवर फार ताण पडतो. याचाच परिणाम म्हणून मतभेद होऊन फ्री डेमोक्रॅटिक पक्षाने ख्रिश्चनांशी काडीमोड केली आणि तो पक्ष सरकारातून बाहेर पडला. ख्रिश्चन डेमोक्रॅटला 'बुंडेस्टॅग'मध्ये संपूर्ण बहुमत नसल्याने चॅन्सेलर एरहार्डचे सरकार कोसळले आणि नवे सरकार स्थापन करण्याचा प्रसंग आला.

परंतु बुंडेस्टॅगमध्ये कुणालाच निर्णायक बहुमत नाही. ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाचे त्यात २४५ उमेदवार आहेत, सोशल डेमोक्रॅटचे २०२ तर फ्री डेमोक्रॅटचे ४९०९ त्यामुळे कोणत्याही पक्षाला दुसऱ्या एखाद्या पक्षाचा आधार घेतल्याशिवाय सरकार उभे करता येत नाही. फ्री डेमोक्रॅटिक पक्षाने ख्रिश्चनांशी काडीमोड घेतल्याने सोशल आणि फ्री हे दोन्ही पक्ष आता एकत्र येतील अशी सर्वांची अपेक्षा होती.

### क्रांतिकारक ऐक्य

परंतु झाले वेगळेच. ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाने चॅन्सेलरपदासाठी कीसींगर या आपल्या उमेदवाराला उभे केले. श्री. कीसींगर यांनी एकदम पवित्राच बदलला आणि संयुक्त सरकार स्थापन करण्यासाठी सरळ सोशल डेमोक्रॅट पक्षाशीच बोलणी केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे गेली कित्येक वर्षे एकमेकांचे कट्टर शत्रू असलेल्या या दोन पक्षांनी आपले विरोध बाजूला ठेवून हातमिळवणी केली आणि संयुक्त मंत्रिमंडळ स्थापले.

ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्ष थोडासा प्रतिगामी मानला जातो. खुला व्यापार आणि अमेरिकेशी घनिष्ट मैत्रीचे संबंध या त्या पक्षाच्या बळकट खुंटया तर सोशल डेमोक्रॅटिक पक्षाला जर्मनीच्या अर्थव्यवस्थेवर शासनाचे नियंत्रण हवे आहे आणि पूर्व युरोपीय राष्ट्रांशी अधिक जवळचे संबंध हवे आहेत. नव्या सरकारचे जे मंत्रिमंडळ

स्थापले गेले आहे, त्याचे चॅन्सेलर कर्ट कीसींगर हे पूर्वीच्या नाझीपक्षाचे सभासद होते. व्हाईस चॅन्सेलर, परराष्ट्रमंत्री आणि पश्चिम जर्मनीचे महापौर ही पदे सांभाळणारे विली ब्रँट हे नाझी जर्मनीचे कट्टर विरोधक आणि नाझी राजवटीत विरोधी भूमिगत चळवळीत होते तर जर्मन एकीकरण या खात्याचे मंत्री हर्बर्ट वेनर हे माजी कम्युनिस्ट !

कुठल्याही सरकारात एवढ्या परस्परविरोधी विचारांच्या व्यक्तींचे एवढे विचित्र कडबोळे नसेल. मग त्यांच्यांत एवढी एकी आली कोठून ? दोनच पर्याय संभवतात. एक म्हणजे या दोन पक्षांतले मतभेद विशेष तीव्र नसावेत किंवा दुर्लक्ष करण्याइतपत सामान्य असावेत. आणि दुसरे म्हणजे हे किरकोळ आणि मोठे मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्यामध्ये जर्मनीला वर आणण्याची, जर्मनीचे मस्तक वर उंचावण्याची एकच ईर्ष्या दोन्ही पक्षांमध्ये असली पाहिजे. या दोन पक्षाच्या हात-मिळवणीमुळे त्यांचे जर्मन बुंडेस्टॅगमध्ये नव्वद टक्क्यांच्या वर बहुमत झाले आहे. जर्मनांची ही राजकीय एकी अभूतपूर्व आहे. आणि या एकीच्या जोरावर पश्चिम जर्मनी आता जागतिक राजकारणात मानाचे स्थान मिळवू पाहत आहे. पश्चिम जर्मनीतील ही राष्ट्रीय जागरूकता पाश्चात्य जगात भय आणि संशय निर्माण करीत आहे.

## वॉल्टर लिप्मनचे भाष्य

या दोन पक्षांच्या एकीमुळे पक्षीय राजकारणाच्या तत्त्वालाही थोडासा धक्काच बसला आहे. पक्षीय राजकारणाची आधुनिक समाजात कितपत उपयुक्तता आहे, किंबहुना पक्ष-पद्धत ही चांगल्या शासनाच्या आड येणारी अडचणच नव्हे काय ? अशा तऱ्हेचे प्रश्न आता या निमित्ताने पाश्चात्य विचारवंत नव्याने विचारू लागले आहेत.

वास्तविक पाहता पक्ष-पद्धतीच्या उपयुक्ततेचा हा मुद्दा मुळीच नवा नाही. आणि पश्चिम जर्मनीच्या अगोदर कितीतरी राष्ट्रांत पक्षीय राजकारणाला तिलांजली देणाऱ्या अशा कितीतरी घटना घडल्या आहेत. जगात आज जी सुमारे १३० सार्वभौम राष्ट्रे आहेत त्यांमधील केवळ २०–२५ राष्ट्रेच काय ती पक्षीय लोकशाही अद्याप योग्य रीतींनी पाळीत आहेत. मग खरोखरच पक्ष राजकारण श्रेष्ठ की अपक्ष सरकार श्रेष्ठ ? जर्मनीमधील नव्या घटनांच्या संदर्भात हा मुद्दा जोराने चर्चिला जात आहे.

पश्चिम जर्मनीतील या ताज्या घटनांवर भाष्य करण्याच्या निमित्ताने ख्यातनाम स्तंभलेखक आणि अमेरिकन विचारवंत वॉल्टर लिप्मन यांनी राजकारणावर चांगलेच कोरडे ओढले आहेत. श्री. लिप्मन म्हणतात, " लवकरच असा काळ येईल की भावी पिढी सिंहावलोकन करताना अमेरिकेतील ढोंगी, खोट्या, फसव्या आणि रानवट अशा पक्षीय राजकारणाकडे तिरस्काराने पाहू लागेल.

पूर्वीचे सर्जन्स शस्त्रक्रिया करताना त्या भावी रोग्याच्या डोक्यावर एखादा दंडुका मारून त्याला बेशुद्ध पाडीत आणि मगच त्याचे हातपाय किंवा जे काही कापायचे ते कापीत. हे वाचून आपल्याला जसे वाटते तसेच या भावी पिढीला आपल्या पक्षीय राजकारणाविषयी वाटेल."

**कर्ट कीसींगर आणि नाझी पक्ष**

पश्चिम जर्मनीच्या राजकारणात एवढी महत्त्वाची क्रांती घडवून आणणारे कर्ट कीसींगर हे पूर्वीचा नाझी पक्षाचे सभासद होते. या बाबींवर बऱ्याच जणांनी आक्षेप घेतला आहे. आणि त्याविषयी अनेक जणांनी टीकाही केली आहे. कीसींगर हे नाझी पक्षाचा सभासद होते हे खरे आहे; पण त्यांचे विचार नाझी नाहीत हेही आता जाहीर झाले आहे.

जर्मनीच्या स्वाबिया या प्रांतात एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेले कीसींगर हे धर्माने कॅथॉलिक आहेत. १९२५ साली त्यांचे शिक्षण पूर्ण झाले तेव्हा जर्मनीमध्ये बेकारीची लाट उसळली होती. त्यांनी पोटाचा व्यवसाय कसाबसा मिळविला. १९३२ सालापर्यंत जर्मन राजकारण हे नाझी आणि कम्युनिस्ट या दोनच पक्षांभोवती फिरत होते. आणि कम्युनिस्टांच्या वर्चस्वापासून धर्म आणि जर्मनी वाचविण्यासाठी जर्मनीतील ख्रिश्चन नेत्यांना नाझी पक्षच तेवढा एक आशेचा किरण वाटत होता. आणि त्या सर्वांचा नाझींना पाठिंबा होता. नाझी पक्षाच्या या लोकप्रियतेच्या लाटेत कीसींगरही वाहवले आणि ते पक्षाचे सभासद झाले.

पण वर्षभरातच त्यांना नाझी पक्षाचे खरे स्वरूप कळून चुकले. आणि नंतर मात्र ते पक्षकार्यापासून दूर राहू लागले. पक्षाचे सभासद मात्र ते जरूर होते. १९४० मध्ये युद्धाची लाट उसळली तेव्हा त्यांना जर्मनीच्या प्रचार खात्यात नाव दाखल करावे लागले. रेडिओवरून परदेशात कराव्या लागणाऱ्या प्रचाराचे लेख त्यांना लिहावे लागत. वरून आलेल्या आज्ञांप्रमाणे त्यांना ही प्रचारपत्रके तयार करावी लागत. पण त्यांमधील वंशवादी ज्यूविरोधी मुद्यांवरील भर ते काढून टाकीत. त्यामुळे नाझी पक्षाची त्यांच्यावर गैरमर्जी झाली आणि ते तुरुंगात पडले.

दोस्त राष्ट्रांनी जर्मनी ताब्यात घेतला तेव्हा नाझी पक्षाचा सभासद म्हणून कीसींगर यांना चौथ्या दर्जाचा गुन्हेगार ठरविण्यात आले. पण पुढे कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट चर्चेसच्या सूचनांवरून कीसींगर यांच्यावरील आरोप काढून टाकून त्यांना मुक्त करण्यात आले.

पुढे पहिल्याच निवडणुकीत श्री. कीसींगर ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षातर्फे बुंडेस्टॅगवर १९४९ साली निवडून आले. पण नऊ वर्षांच्या विफल अनुभवानंतर कर्तबगारीला पुरेसा वाव मिळत नाही, असे पाहून त्यांनी शेवटी बादेन वर्टेम्बर्ग या राज्याचे गव्हर्नरपद स्वीकारले. आणि त्या राज्यात एक आदर्श शासन निर्माण करून दाखविले. बुंडेस्टॅगमध्ये जेव्हा पेचप्रसंग निर्माण झाला तेव्हा ख्रिचन डेमो-

क्रॅटिक पक्षाने पुन्हा कीसींगर यांना वर बोलावून घेतले. आणि एकदा संधी मिळताच श्री. कीसींगर यांनी मोठ्या कुशलतेने सोशल डेमोक्रॅटिक पक्षाशी बोलणी करून या दोन पक्षांची ही अभूतपूर्व एकी घडवून आणली.

नव्या जागरूकतेने आता पश्चिम जर्मनी जागतिक राजकारणात प्रवेश करीत आहे. पूर्व जर्मनीच्या दिशेने एकीकरणासाठी खडे टाकण्याचे प्रयत्न आता या नव्या सरकारने अधिक जोमाने सुरू केले आहेत. पश्चिम जर्मनीच्या आर्थिक प्रगतीचा वेग आधीच अफाट आहे तो अधिक वाढविण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. लष्करी आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याविषयी पश्चिम जर्मनीत आधीपासूनच ओरड सुरू झाली होती. ती आता आणखी वाढेल.

पश्चिम जर्मनीतील दोन पक्षांची ही युती. यामागे केवळ पक्षीय राजकारण नाही. जर्मन राष्ट्रीय अस्मितेच्या पुनरुज्जीवनाचा तो प्रयत्न आहे. आणि या अस्मितेच्या आड येणारी मतभिन्नता, विरोध, भांडणे विसरून जाण्यास पश्चिम जर्मनीतील जनता आता उत्सुक झाली आहे हेच यावरून दिसते.

●


# "डायमंड"

**टॅक्सी व रिक्षा मीटर्स**

भारतात सर्वप्रथम

**डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,**

११८० बुधवार पेठ, पुणे २.

**डायमंड वॉच कंपनी**

**११७९ बुधवार पेठ, पुणे २.**

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

## धन्य ! ज्ञानदेवा

ज्ञानियाच्या झोपडीचा
आज झालासे महाल ।
नाथ निवृत्ती बिचारा
दास झाला द्वारपाल ।।

मत्त लाथा उद्धतांच्या
साहतो सोपान माथा ।
बाप रखुमादेविवर तो
पोरका झाला विधाता ।।

विष्णुची सौभाग्य-लक्ष्मी
ज्ञानियाचे घर रिगाली ।
शेषशयना सोडुनीया
सुख–विलासी दंग झाली ।।

आणि देवेन्द्रासवे ती
खेळताहे सारिपाट ।
सोवळ्या इन्द्रायणीचा
आगळा नखरेल थाट ।।

दग्ध झाला दारचा तो
दिव्य पिंपळ सोनियाचा ।
बोलती निर्बुद्ध रेडे–
कोरडी वेदान्त–वाचा ।।

ज्ञानियाच्या मंदिराची
बंद झाली सर्व दारे।
"ताटि उघडा ज्ञानदेवा !"
आर्त मुक्ता हंबरे रे ! ।।

वाट पाहे नामयाची
भाबडी भोळी जनाई ।
धन्य ! आपण ज्ञानराजा !
धन्य अपुली ही कमाई ।।

*– मा. ल. व्यवहारे*

## सोनपिशी

वळणावरच्या बांधावरती
सोनपिशी बाभळ ध्यानमग्ना
उग्रगंधी बहर जाणारी
कणाकणाने थिजणाऱ्या अंधारी
उत्कट झाल्या मूक भावना
आणि शेवटचे बोलण्यासाठी
तुझे ओठ विलगता . . .

कंपवेड्या झुळुकीने
पखरण झाली सोनफुलांची
बघता बघता निखळुनि गेली
उत्कटलेली भावबंधने
सोनपिशी बाभळ गंधमग्ना
किंचित हलली, सळसळली
झरझर सोनफुलांची अन्
पखरण झाली . . .

आज पाउले पुन्हा एकदा
न कळत तिकडे वळली
अन् नजर अचानक
अतीत पाहता ढळली
मनात हलली बाभळ उग्रगंधा
वेडात नव्या ती नटली अन्
पुन्हा एकदा सोनफुलांची
पखरण झाली.

*– सौ. लीला धनपलवार*



# आस्वाद

'सोनपिशी' ही एक संवेदनाशील जीवनाची प्रतिकृती आहे. बाभळीचे प्रतीक वापरले आहे. ही बाभळ एकदा आपणांला ध्यानमग्न दिसते. पुढे होते ती गंधमग्ना. नंतर उग्रगंधा. लीला धनपलवार यांनी मानवी भावना चित्रीत करण्यासाठी बाभळीच्या भोवतीचे वातावरण चित्रीत केले आहे. जाति पादाकुलक वापरली आहे. पण ती अनियमितपणे कुठे अर्धी ओळ, तर कुठे मात्रांची कमीजास्त संख्या. हा अनियमितपणा नसता तर कदाचित् कवितेची गोडी अधिक वाढली असती. शेवट काहीसा धूसर आहे. सोनफुलांची पखरण दोन-तीन वेळा होते. तो एक अनुबंध सर्व कल्पनांत खेळवला आहे.

ध्येय आणि व्यवहार यांच्यांतली तफावत हा कवीच्या क्रंदनाचा सनातन विषय आहे. पण सनातन तितकाच नवीन. संत आणि प्रेपित यांच्या दिव्य उपदेशाची व आचरणाची पुढे विकृती होते. ज्ञानेश्वरांच्या अलौकिक वाणीचे आज केवढे अवमूल्यन झाले आहे हे मा. ल. व्यवहारे यांनी मोठ्या कळवळ्याने मांडले आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या परिवारातले सारे संकेत, प्रतीके, नामे वापरून मोठे विदारक चित्र त्यांनी रेखाटले आहे. मात्र शेवटची ओळ काहीशी दिशाभूल करणारी वाटते. जणू काही ज्ञानेश्वरांनाच उपरोधपूर्वक कवी विचारतो आहे असा भास होतो. आपल्या दिव्य संदेशाचे समाजाने वाटोळे केले असे ज्ञानेश्वरांना वाटते आहे हा शेवट अधिक सुरस झाला असता. या साऱ्या कवितेत एक मुक्ताई काय ती आपल्या उच्च भूमिकेवर स्थिर आहे. पण कवितेतले आक्रंदन हृदयाला जाऊन भिडते.

●

*— गोपीनाथ तळवलकर*

# म्हणाली पचळी...

गोपाळ रेडगावकर

आणि एक दिवस असा उजाडला की त्या दिवशी सकपाळ आळीने आकांताने आकाशपाताळ एक करून आपलं दु:ख जाहीर केलं.

सकपाळ आळीच्या शेवटच्या टोकाला रुपेश्वराचं एक पडकं मंदिर होतं. रुपेश्वराची भग्न–पिंड अभिषेकाची वाट पाहत कोरडी ठाक पडली होती. त्या मंदिराच्या आवारातच सकपाळ आळीचं दैव, ब्रह्मज्ञान राहत होते. त्या ब्रह्मज्ञानाचं नाव ईश्वरीबाई. बाईचं नाव ईश्वरी कोणी ठेवलं ईश्वराला ठाऊक ! जपजाप्य ब्रह्मसंकीर्तनात सामील होणारी ईश्वरीबाई नेमकी कोणाची कोण याचा पत्ता गावच्या तरुण पिढीला नव्हता, सपकाळ आळीतल्या लोकांनादेखील नव्हता. सकपाळ आळी आपल्या उराशी बाळगलेल्या भग्न रुपेश्वराप्रमाणेच ईश्वरीबाईकडे पाहत होती.–सुरकुत्यांच्या लाटा अंगभर पसरलेल्या होत्या. डोळे अती खोल गेले होते. कपाळावरचा बुक्का त्या फटफटीत चेहऱ्याचे भीषण स्वरूप जागृत करत होता. तिच्या गळ्यातील तुळशीची माळदेखील पाहणाऱ्याला सारखी निर्जीव भासत होती. रुपेश्वर असं सारं दृश्य पाहत होता, पण त्याला त्याचं काही दु:ख नव्हतं. मानवी सुखदु:खाच्या कल्पनेत रममाण होण्यासारखं त्याचं मन कमकुवत नव्हतं. होता तो पाषाणच, पण त्याहून कितीतरी कठीण अंत:करणानं तो सारं जग पाहत होता. कोणी यावं, वाटलं तर अभिषेक करावा. हौसेनं उदबत्ती पेटवावी. कोनाड्यातल्या पणतीत तेलाचा थेंब टाकीत 'हरि ॐ' म्हणून ओरडावं. घंटेच्या रिकाम्या जागेकडे कडवट नजरेनं पाहत म्हणावं, "च्यायची खटखट, साली घंटादेखील नेली की चोरून." नाही म्हणायला सोमवारी मात्र यथासांग पूजा व्हायची. लोक आपल्या परीने देव सजवायचे. उदबत्तीच्या मधुर गंधानं गाभारा अन् ओवरी भरून जावयाची.

" गावकरी मंडळींनो, तुम्ही आलात म्हणूनच आम्ही पैसे देतो. तुम्ही भावी आमदार, खासदार, देशाचे खांब. पण खरं सांगायचं म्हणजे तुम्ही चोरांच्या समाध्या बांधता आहात...."



या रुपेश्वराजवळ राहणारी ईश्वरीबाई 'संत' म्हणून प्रसिद्ध होती, त्याच-प्रमाणे ती लोकांना देवतेसमान वाटत होती. जवळपासचे लोक तिला फार मानीत. थोडे थोडे चमत्कार ती करते, असा समज होता. लोक रुपेश्वराला आले की म्हातारीकडे आगत्याने यावयाचे. तिच्याकडून प्रसाद मिळवायचे. आशीर्वाद मिळा-वयाचे. उपदेश मिळावयाचे. असे कित्येक वर्षे चालत होतं. अगदी परवापरवा-पर्यन्त. पण एक दिवस उजाडला अन्...सकपाळ आळीनं आकांत केला. रुपेश्वरा-जवळ राहणारी म्हातारी ईश्वरीबाई एकाएकी आटपली. ताप नाही, खोकला नाही, काही नाही. खुटकन् प्राण् गेला म्हातारीचा. लोकांना ही बातमी समजली. सकपाळ आळीनं आकांत केला. गावाला फार दुःख झालं. आयाबाया रडत राहिल्या.

बरोबरच होतं. त्यांच्या पोरांना गंडेदोरे मिळत होते. वर्षातून दोनदा वर्गणी काढून भंडारा होत होता, तो ईश्वरीबाईच्या सांगण्यावरून. तो बंद होण्याची वेळ आली. म्हातारीमुळे रुपेश्वराला अन् सकपाळ आळीला महत्त्व आलं होतं. सारा गाव म्हातारीच्या अंत्यदर्शनाला आला होता. फक्त गावातला एकच अवलिया तिला आणि तिच्या संतपणाला शिव्या देत होता. तिला 'बदमाष औरत' म्हणत होता. अन लोकांना 'पगले' म्हणून म्हणत होता.

तो अवलिया राहायचा नदीकाठी एक मारुतीचं मंदिर होतं तिथं. हा अव-लियादेखील अतिशय म्हातारा होता. जवळ जवळ ह्या म्हातारीइतका म्हातारा.

लोकांनी म्हातारीची अंत्ययात्रा तिच्या शेवटाला साजेल अशीच काढली. वर्गणी वर्गणी जमा झाली. बाराव्या-तेराव्याची जेवणं झाली. एवढं करूनदेखील उत्साही लोक थांबले नाहीत. त्यांनी ठरवलं की ईश्वरीबाईच्या नावानं एक धर्मशाळा बांधायची, त्यात तिची समाधी बांधायची, एक पुतळा उभा करायचा. हे ठरलं आणि ठरवलं सकपाळ आळीकरांनी. कार्यकारी मंडळ त्यांचं. क्रियाशील सभासद तेच. गावकरी फक्त वर्गणीदार.

काही दिवस असेच गेले. वर्गण्या जमा होत होत्या. धर्मशाळा बांधण्याचं सामान इमारत-समिती खरेदी करीत होती. पाया खणला जात होता. नेमकं त्याच वेळी बांधकाम समितीच्या सर्वांनी आपापली घरे बांधावयास काढली. ईश्वरी योगायोग म्हणतात तो असा. बांधकाम चालू असता तो अवलिया तेथे येत होता. कामाकडे पाहून पचापच थुंकत होता. आकाशाकडे पाहून अभद्र शिव्या देत होता. बांधकामा-वरचे लोक त्याला बळेच बाजूला नेत होते. त्याची समजूत घालत होते. पण तो मात्र ऐकत नव्हता.

" देवाच्या कामात व्यत्यय आणू नका बाबा, " असं कोणी म्हटलं, की अवलिया भरमाप शिव्या देत होता. याच वेळी अवलियाचे वर्तन पाहून सर्वांना आश्चर्य वाटत होते. सर्व गावात तो चर्चेचा विषय झाला होता.

अखेरीस बांधकाम-समितीत मारामाऱ्या लागल्या. सभा भरत होत्या. बिलं

नीट ऑडिट होत नव्हती. मागील हिशेब जमायला तयार नव्हता. सकाळी ट्रक मधून आलेल्या विटा नाहीशा होत होत्या. सिमेंट पसार होत होतं. लोक बांधकाम समितीला शिव्या देत होते. गावकरी समजले. त्यांनी दुसरी समिती नेमा, असा आग्रह धरला. समितीचे लोक पैसे संपले, असे म्हणू लागले. यामुळं झालं काय, गावात उघड दोन पक्ष पडले.

लोकांना वाटलं अवलियाचा शाप भोवतो आहे. काम थांबलं. अवलियाचं समाधान झालं. तो तिकडे फिरकेना. मारुतीच्या मंदिरात तो बसून राहत असे. मनाशीच हसत असे. डोळे मिटून भजन करत असे. हळूहळू लोक अवलियाच्या भजनी लागले. त्याला मानू लागले. कोणी त्याला संत पुरुष समजू लागले तर कोणी मारुतीचा अवतार मानू लागले. लोकांची श्रद्धा बसू लागली. मारुतीच्या मंदिरात गर्दी जमू लागली. रात्री भजनाच्या बैठकी होऊ लागल्या. पूर्वीचं एकाकी मंदिर गजबजू लागलं. बेवारशी कुत्र्यांचं ते मंदिर आश्रयस्थान होतं. कुत्री-डुकरं जमत आणि घाण करीत. अवलिया चमत्कार करतो, अशा वार्ता येऊ लागल्या. आता लोकांनी कुत्र्यांना मज्जाव करावयास सुरुवात केली. त्यातूनच मंदिराभोवती भितींचं कंपाऊंड घालण्याची प्रथम कल्पना निघाली. यावर गावकऱ्यांनी जनरल मिटिंग घेतली. पुष्कळसे गावकरी सभेस आले. ठराव पास झाला. कार्यकारी मंडळ झालं. बांधकाम समिती ठरली. अवलियाचा जयजयकार झाला. गावातले दोन गट पक्के झाले. रुपेश्वराच्या मंदिरातल्या ईश्वरीबाईचा गट तर दुसरा मारुतीच्या देवळातील अवलियाचा भगत गण.

मारुतीच्या मंदिराला आता असाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. अवलिया बाबाचे फोटो दुकानांत, घरांत झळकू लागले होते. लोक अवलियाबाबापुढे आरती करीत. त्याला चांगलेचुंगले खायला आणत. पण त्याच्या हिशेबी त्या गोष्टी नव्हत्याच. त्याला याचं काही सोयर सुतक नव्हतं.

असं करता करता अवलिया आजारी पडला नि त्यातच गमावला. पुन्हा तेच ईश्वरीबाईसारखंच झालं. गावकरी जमले. भजन करत अवलियाबाबाला मूठमाती दिली. पुन्हा वर्गणी जमा करायचं ठरलं. वर्गणी जमा व्हायला लागली. बारावा-तेरावा झाला. दोन गटांत फार भांडण जुंपलं. मारामारीपर्यंत वेळ आली. अवलियाबाबाचा मठ अन् समाधी बांधावी असा बूट निघाला. पावती-पुस्तके छापली गेली. जाहिराती छापल्या गेल्या. मदतीसाठी सटरफटर कार्यक्रम झाले. पैसा जमू लागला. घरोघर जाऊन तथाकथित कार्यकर्ते वर्गणी जमा करू लागले. यातून 'अवलिया श्रमविहार कुटी' बांधली जाणार होती.

एकदा समितीचे पुढारी–कम्–म्होरके खटमलशेटकडे तो काही घवघवीत देईल या आशेने गेले. खटमलशेटने त्यांचे स्वागत तर उत्तम केले. गरम गरम तडकी डाळ, शेव, गुलाबी चहा झाला. पुढाऱ्याने बाबांची महती गायली. गावचं मागासले-

पण साभिनय सांगितलं. ईश्वरीबाईची धर्मशाळा व तिचा पैसा खाऊन गेलेल्या लोकांना शिव्या दिल्या. खटमलशेटचा म्हातारा सारं बोलणं ऐकत होता. त्याचं नाव उत्तमशेट. आलेली मंडळी पाचशे रुपये धर्मादाय मागत होती. खटमल फक्त पाच रुपये देत होता. साधारण सौदा जमत नव्हता. उत्तमशेट म्हणाला,

"गावकरी मंडळींनो, तुम्ही आला म्हणूनच आम्ही पैसे देतो. तुम्ही भावी आमदार, खासदार, देशाचे खांब. खरं सांगावयाचं म्हणजे तुम्ही चोरांच्या समाध्या बांधता कशाला ?"

"चोरांच्या, ते कसं शेट ? अवलियाबाबा म्हणजे..."

"संत पुरुष...निस्पृह होते महाराज," दुसरा.

उत्तमशेट खळखळून हसला अन् म्हणाला, "नका सांगू—तुम्ही सगळे नवे, जवान तिशी—पस्तीशीचे. पूर्वीचा इतिहास ठाऊक नाही कोणाला ? माझं वय ऐंशी वर्षांचं. मी अवलियापेक्षा वडील आहे वयानं. या भागात एक प्रसिद्ध दरोडेखोर होता. सुमारे पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. तो दरोडेखोर म्हणजे सत्या. त्याला तमाशाचा फार नाद. त्यानं तमाशातून एक पोर पळवली होती. तिचं नाव मैना. या भागात धुमाकूळ घातला त्यानं. शेवटी सरकारनं त्याच्या घोट्याच्या शिरा तोडल्या. त्यानं साथीदार जमा केले. मैना साथ देत होती. पुढं वयोमानानं थकला. मैना थकली. तुरुंगातून बाहेर आले. काही दिवस एकत्र राहिले मग झालं भांडण. दोघं वेगळे राहू लागले. ही त्या दोघांची हकीकत. ते सत्या, मैना म्हणजेच ईश्वरी अन् तुमचा अवलिया होत. खोटं वाटत असेल तर पोलीस कचेरीतले चाळीस वर्षांपूर्वीचे कागद पाहा. मग बोला. पण तत्पूर्वी खटमलशेट पाच रुपये देतात ते घ्या अन् बांधा तोंडा. सत्याचा चोरीचा माल मी विकत घेत होतो. मला पण शिक्षा झाली होती. हा इतिहास आहे. तुम्ही आमदार होणार पुढं, म्हणूनच पाच रुपये देतो ते घ्या..."

उत्तमशेटची हकीकत ऐकून पुढारी—कम—देशसेवक बर्फासारखे थंडगार पडले होते, तरी त्यांच्या नजरा खटमलशेटच्या मागे असलेल्या तिजोरीवर लागल्या होत्या. ●



माझ्या वसंताने हा प्रश्न चार वेळां विचारलाय आजपर्यंत...कां नाही मी झालो डॉक्टर? बरोबरचे सर्व मित्र शिकले—डॉक्टर, इंजिनियर, वकील झाले. परंतु माझ्यावर मात्र अचानक आभाळ कोसळ्ले. चांगले मार्कस् मिळूनही इंटर नंतर मला नोकरीच पत्करावी लागली. बाबांचा-सगळा संसार एकदम माझ्या खांद्यावर आला. आज वसंता सहा वर्षांचा आहे. माझे हात पोळ्ले पण मुलाचे पोळणार नाहीत याची मी आज तरतूद करून ठेवली आहे. माझे बरे-वाईट कांहींही झाले तरी वसंताचे शिक्षण सुरळीत पार पडेल...त्याच्या आवडीचें डॉक्टरकीचेही. निव्वळ त्याकरतांच मी विमा उतरवला आहे. त्याचें शिक्षणाचे वय झाले की आपोआप पुरेसा पैसा विम्यांतून येईल. मग मी असो वा नसो. पाठीशी आयुर्विमा आहे म्हणूनच आज मी माझ्या वसंताची पापी घेतो व तोंड भरून त्याला आशीर्वाद देऊं शकतो, "राजा, आतां तूं हो डॉक्टर"

**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं



"बाबा
तुम्ही डॉक्टर
कां हो नाही
झालांत?"

PRATIBHA/662

# आणि ड्रॅगन जागा झाला

## अरुण साधू

### उत्तरार्ध :

### लेखांक पहिला

कम्युनिस्टांची चळवळ कायमची गाडून टाकण्यासाठी चँग-कै-शेकने आपली सर्व शक्ती पणाला लावून लागोपाठ ज्या पाच निर्मूलन मोहिमा उघडल्या, त्यांचे वर्णन करण्याआधी त्या वेळी अधिकृत चिनी कम्युनिस्ट पक्षाची सूत्रे हलविणारा ली-ली-सान या क्रांतिकारकाविषयी थोडीशी माहिती सांगणे आवश्यक आहे. कारण ली-ली-सानच्या आग्रही घोरणानुसार वागल्यामुळे लाल सैन्याने जे थोडे आक्रमक धोरण मध्यंतरी स्वीकारले त्यामुळेच चिडून जाऊन चँगने कम्युनिस्टांविरुद्ध मोहीम उघडली.


ली-ली-सानच्याच आग्रहाखातर पेंग तेह हुईला चिंगकाशान तळावरून खाली उतरल्यानंतर चांगशा शहरावर हल्ला करावा लागला होता. पेंगने चांगशा काबीज केले आणि दहा दिवसपर्यंत शहरावर ताबा टिकविला. पण याची त्याला मनुष्य-

माओ-त्से-तुंग आणि चुह तेह यांची चिंगकाशान तळावर युती झाल्यानंतर अधिक स्थिर व सुरक्षित सोव्हिएट तळ स्थापन करण्यासाठी ते चिंगकाशान पर्वतावरून सैन्यासह खाली उतरले. वाटेत ठिकठिकाणी लढे देत, मनुष्यबळाची जबर किंमत देत ते हुनान-कियागसी सीमेवर पोचले आणि तेथे त्यांनी आपले पाय घट्ट रोवले.

हे सोव्हिएट आता वाढू लागले होते. आजूबाजूच्या प्रदेशात लाल सैनिकांनी हळहळू हातपाय पसरायला सुरुवात केली होती आणि अधिकाधिक प्रदेश कम्युनिस्टांच्या ताब्यात येऊ लागला होता. हुनानची राजधानी चांगशा या शहरापर्यंत लाल सैनिकांची मजल गेली, तेव्हा मात्र चँग-कै-शेकने या या सोव्हिएटचा धोका वेळीच ओळखला आणि आपली सारी शक्ती इरेस घालून कम्युनिस्टांना समूळ नाहीसे करण्याच्या योजना तो आखू लागला. पुढील तीन वर्षांत त्याने या सोव्हिएट तळांवर पाच वेळा प्रचंड शक्तीनिशी हल्ले केले. चिनी इतिहासात ते हल्ले 'पाच निर्मूलन मोहिमा' म्हणून प्रसिद्ध आहेत.

बळामध्ये जबर किंमत द्यावी लागली होती. पेंग अयशस्वी झाला तरी ली-ली-सानच्या हट्टामुळे दुसऱ्याही वेळी पेंगने माओ, चुह व त्यांचे सैन्य एकत्र आल्यावर चांगशाच्या परकोटापर्यंत अयशस्वी धडक मारली होती. या धाडसामुळेच चँग-कै-शेकची वक्रदृष्टी सोव्हिएटस्कडे वळली.

माओ-त्से-तुंगप्रमाणे ली-ली-सान हा हुनानी होता. पण त्याचे बरेच शिक्षण फ्रान्समध्ये झाले होते. ली हा अतिशय कुशाग्र बुद्धीचा पण तुसड्या वृत्तीचा कम्युनिस्ट होता. परदेशात शिक्षण घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांचे कम्युनिस्ट पक्षात मोठे वजन होते. १९२७ नंतर जो थोडाफार अधिकृत कम्युनिस्ट पक्ष उरला होता तो भूमिगत झाला. आणि १९२९ मध्ये ली-ली-सानला या भूमिगत पक्षाचा जनरल सेक्रेटरी नेमले. लीचे विचार स्टालिनपेक्षा ट्रॉट्स्कीच्या बाजूकडे जास्त झुकणारे होते.


चीन
सोव्हिएट रशिया
बाह्य मंगोलिया
आंतर मंगोलिया
सिंकियांग
काश्मीर
पश्चिम पाकिस्तान
दिल्ली
तिबेट
नेपाळ
भारत
पूर्व पाकिस्तान
कलकत्ता
ब्रम्हदेश
थायलंड
लाओस
व्हिएटनाम
हेनान
फिलिपाइन्स
फोर्मोसा
हाँगकाँग
कँटॉन
पेकिंग
कोरिया
नानकिंग
शांघाय
वुहान
चांगशा
हुनान प्रांत
पीत नदी उर्फ ह्वांग हो
यांगत्से नदी
येनान
शेन्सी प्रांत

## ली-ली-सानच्या धोरणाने अपयश

त्या काळात अधिकृत चिनी कम्युनिस्ट पक्षाची प्रमुख भूमिगत ठाणीं शांघाय आणि हँकोव येथे होती. या दोन्ही ठिकाणी ली जाऊन येऊन असे. कम्युनिस्ट पक्षाचा भूतपूर्व सेक्रेटरी चेत तु हसूप्रमाणेच लीचाही ग्रामीण विभागात सोव्हिएटस् स्थापण्यावर व शेतकऱ्यांच्या क्रांतिक्षमतेवर विश्वास नव्हता. 'कम्युनिस्टांनी आक्रमक धोरण स्वीकारून चांगशा, वुहान, नानचांग व आणखी शक्य असेल त्या मोठ्या शहरांवर हल्ले करून ती ताब्यात घ्यावीत असा त्याचा आग्रह. शहरातूनच क्रांती होईल. खेड्यांत दशहतीचे वातावरण निर्माण करून शहरांमध्ये कामगारांनी एकत्र येऊन उठाव, संप आदी उपायांनी व्यवहारांना खीळ घालावी, रशियाच्या साहाय्याने आऊटर मंगोलिया व मांचुरियामधून कोमिन्टांग व सुभेदारी सरदारांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले' करून क्रांती घडवून आणावी, असे त्याचे मत होते. माओच्या सोव्हिएटस् स्थापण्याला त्याचा सक्त विरोध होता.

लीचा कम्युनिस्ट ताकदीचा अंदाज वाजवीपेक्षा जास्त होता. लीला वाटत होते क्रांती आता जवळ आली आहे. एक-दोन महत्त्वाच्या शहरांवर घाव घातले म्हणजे झाले. त्याच वेळी चँग-कै-शेक उत्तरेच्या सुभेदारांचा बंदोबस्त करण्यात गुंतला होता. त्यामुळे हीच संधी योग्य आहे. भराभर शहरे जिंकून घ्या असे ली सांगत होता.

परंतु लीच्या अंदाजापेक्षा कम्युनिस्ट व लाल सैन्याची ताकद बरीच कमी आहे हे चांगशावरील दोन अयशस्वी हल्ल्यांवरून सिद्ध झाले. त्यामुळे चँगची दृष्टी मात्र सोव्हिएटसूच्या मुळावर वळली, या अपयशामुळेच ली-ली-सानच्या धोरणाचा पराभव झाला आणि १९३१ मध्ये कोमिन्टार्नने त्याला मॉस्कोला "अभ्यासासाठी" म्हणून बोलावून घेतले. पण मॉस्कोच्या दृष्टिकोनातून लीने केलेली खरी घोडचूक वेगळीच होती. लीला चीनविषयी विलक्षण अभिमान वाटत होता. लीच्या मते चीन हेच साऱ्या जगातील क्रांतीचे केंद्रस्थान होऊ शकत होते. मॉस्को नव्हे. हीच ती चूक. ली मॉस्कोला गेल्यानंतर मात्र माओच्या धोरणाचे यश उघड झाले. सोव्हिएट तळांचे यश, लाल सैन्याचे वाढते सामर्थ्य बघून कोमिन्टार्ननेही माओच्या 'चुकीच्या' धोरणाकडे दुर्लक्ष करून त्याच्या सोव्हिएटसना अधिकृत मान्यता दिली.

ली मॉस्कोला परत गेल्यावरही लाल सैन्यात लीच्या धोरणाचे काही पुरस्कर्ते होतेच. आणि त्यांनी सैन्यात उठाव करण्याचे प्रयत्नही केले. फू तियेन या गावाजवळ लिऊ ति त्साओ या अधिकाऱ्याने उघड बंड केले. अनेक लाल अधिकाऱ्यांना आणि कियांगसी प्रांतीय सोव्हिएटच्या अध्यक्षाला त्याने अटक केली. पण हे बंड फार काळ टिकले नाही. लवकरच लिऊ व त्याच्या अनुयायांना पकडून ठार मारण्यात आले. 'ली-ली-सान वादाचा' पूर्ण पराभव झाला खरा, पण हे वादळ

शमेपर्यंत चँग-कै-शेकची प्रचंड सुसज्ज सेना सोव्हिएटस्वर तुटून पडण्यासाठी दबा धरून बसली होती.

माओ–त्से–तुंग आणि साऱ्याच कम्युनिस्टांच्या दुर्दशेला सुरुवात खरी म्हणजे १९२७ पासूनच झाली होती. तेव्हापासूनच ते देशोधडीला लागून जिवंत राहण्यासाठी धडपडत होते आणि सुरक्षित आसऱ्यासाठी वणवण हिंडत होते. पण १९३० पासून चँगने आपल्या निर्मूलन मोहिमा उघडल्यावर तर त्यांच्या हालअपेष्टांना पारावार उरला नाही. त्या स्थितीत ते टिकून राहिले हेच आश्चर्य.

या असंख्य झटापटींमध्ये लढायांच्या, भ्रमंतीच्या, धामधुमीच्या काळात माओचे खाजगी जीवन होते तरी कसे ? तो कसा राहत होता ? त्याचे कुटुंब कोठे होते ? या सर्व गोष्टींविषयी अतिशय त्रोटक माहिती मिळते. तीसुद्धा इतस्तत: विखुरलेली.

## रानावनातील वणवण

माओचा यॉंग कुई हुईशी १९२० साली प्रेमविवाह झाला होता. त्याची बायको ही स्वत: क्रियाशील क्रांतिकारक असल्याने त्या दोघांच्या सहवासाचा काळ फार कमी असे. ती एका खेड्यात तर माओ दुसरीकडेच, असेच जास्त वेळ घडे. यॉंगला दोन मुले झाली. माओचे आपल्या या पत्नीवर निरतिशय प्रेम होते. परंतु पक्षाच्या कामामुळे माओ, पत्नी आणि मुले असे सारे कुटुंब एकत्र येण्याचा योग क्वचितच जमून येई. मुलांनाही कित्येक वेळी दुसऱ्याच्या घरी ठेवून यॉंगला फिरतीवर जावे लागे.

परंतु या माओच्या लाडक्या बायकोला कोमिन्टांगच्या सैनिकांनी पकडून १९३० मध्ये ठार मारले. लाल सैन्याची हुनान व कियांगसी प्रांतांत प्रतिष्ठा वाढत होती. माओ व चुह यांची नावे तर ज्याच्या त्याच्या तोंडी होती. कारण त्यांना जिवंत अथवा मृत पकडून देणाऱ्यास लाखांनी बक्षिसे देण्याचे चँग-कै-शेकने जाहीर केले होते. सियांग तांग येथील माओ कुटुंबाच्या घरादारावरून कोमिन्टागने नांगर फिरवला. त्यांची जमीन जप्त केली. कुटुंबातील सर्वांना अटकेत टाकले. त्यांपैकी माओची पत्नी व धाकटी बहीण कम्युनिस्ट क्रांतिकार्यात भाग घेतात म्हणून त्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले.

यॉंगवर माओचे फार प्रेम होते. माओ कवी होता. पण भावनाप्रधान नव्हता. रोज जीवनमरणाशी झगडा करणाऱ्या कम्युनिस्ट क्रांतिकारकाला भावनाप्रधान होऊन चालणारे नव्हते. आपल्या बायकोच्या मृत्यूची बातमी त्याने ऐकली असेल तेव्हा तो असाच एखाद्या रक्तमय चढाईत गुंतला असला पाहिजे.

मध्यवर्ती सोव्हिएट तळाचा माओ अध्यक्ष होता खरा, पण त्याची सरकारी कचेरी मात्र कधी एखाद्या झाडाखाली तर कधी एखाद्या जुनाट तंबूत, कधी एखाद्या शेतकऱ्याच्या झोपडीत तर कधी कुठल्या गुहेत, अशी सारखी सुरक्षिततेसाठी



सोव्हिएट नेता माओ

फिरतीवर असे. सारे सोव्हिएट सरकारच भ्रमंतीत असे. कधी सोव्हिएट सरकारच्या ताब्यात एक-दोन लाख लोकसंख्या असलेले काही जिल्हे असत तर कधी एखादा प्रचंड भूपट्टा लाल सैन्याच्या आधिपत्याखाली येई.

सोव्हिएट सरकारचा अध्यक्ष असला तरी माओ-त्से-तुंगची राहणी अतिशय साधी होती. साधा सैनिकाच्या पोशाखाचे दोनच जोड त्यांच्याजवळ होते. अंथरायला एक सतरंजी व कापूस-लोकरमिश्रित अशी दोन पांघरुणे होती. शिवाय एक स्वेटर, भात शिजविण्यासाठी कटोरा, ठिगळे लावलेली छत्री आणि सात-आठ कप्पे असलेली एक ब्रीफकेस एवढेच वैयक्तिक सामान त्याच्याजवळ होते. फिरतीवर असताना आपली छत्री व ब्रीफकेस माओ स्वतःच सांभाळीत असे. इतर सामानाचे गाठोड त्याच्या देखरेखीसाठी दिलेला नोकर सांभाळी. मुक्कामावर पोचताच हा नोकर त्याचे अंथरूण पसरी आणि इतर सामान माओ उशीसारखे वापरी.

पण माओ फारच कमी झोप घेत असे. रात्रीचे जेवण झाले की तो आपल्या ब्रीफकेसमधून कागद, पेन्सिल, नकाशे काढून दिव्याच्या प्रकाशात काम करीत बसे. तो एकदम मध्यरात्रीपर्यंत. नंतर तो आपल्या नोकराला उठवून वादलीतून थंड पाणी मागवी. हातपाय तोंड धुऊन ताजेतवाने झाल्यावर त्याला भूक लागे. मग

त्याचा नोकर दुपारच्या वेळी शिजविलेला भातच गरम करून देई. तो खाऊन भात उरला तर माओ तो फेकून न देता एखाद्या कागदाच्या तुकड्यात दुसऱ्या दिवसासाठी झाकून ठेवी. मात्र फेकून देणे त्याला मुळीच आवडत नसे. मध्यरात्रीची ही न्याहरी आटोपल्यानंतर तो पुन्हा बराच वेळपर्यंत काम करीत बसे. माओच्या या साधेपणाचे व कष्टाचे लाल सैनिकांपुढे चांगले उदाहरण होते.

या साधेपणामुळे, कष्टाळूपणामुळे, ध्येयासाठी प्रामाणिकपणे सर्व शक्ती पणास लावून लढण्याच्या जिद्दीमुळे आणि माओ व चुह यांच्या गनिमी धोरणामुळेच पुढच्या पाचही निर्मूलन मोहिमांमधून लाल सैन्य जिवंत राहू शकले.

## निर्मूलन मोहिमा

कम्युनिस्टांच्या व सोव्हिएट्स्च्या निर्मूलनाची पहिली मोहीम चँग-कै-शेकने १९३० च्या शेवटाला सुरू केली. तुंगकु व सिंगकुओ या दोन डोंगरी शहरांभोवती कियांगसी व फुकियेन प्रांतांच्या सरहद्दीवर माओचे सोव्हिएट होते. सुमारे एक लाख सैन्यानिशी लु ति पिंग नावाचा चँग-कै-शेकचा एक जनरल या सोव्हिएटवर चालून आला. सोव्हिएटमधून बाहेर पडण्याच्या वाटा रोखून चार बाजूंनी हळू हळू त्याने आपल्या सैन्याचे पाश सोव्हिएटभोवती आवळण्यास सुरुवात केली.

या संकटाला तोंड देण्यासाठी माओ व चुह तेह यांनी सुमारे चाळीस हजारांचे लाल सैन्य कसेबसे जमा केले. चिंगकाशान तळापासून त्यांना आपल्या गनिमी युद्धाचा चांगलाच सराव झाला होता. याही वेळी त्यांनी आपल्या गनिमी पद्धती अत्यंत यशस्वीपणे वापरल्या. कोमिन्टांगच्या तुकड्यांना सोव्हिएट क्षेत्रात भरपूर आत येऊ देऊन एकाएकी त्यांच्यावर हल्ले चढवून त्यांनी यथेच्छ चोप दिला. चारी बाजूंनी एकदम एकत्र येऊन शत्रूच्या एखाद्या तुकडीवर विजेच्या चपलतेने हल्ला करणे व शत्रूचे मोठे सैन्य अंगावर येताच त्याच वेगाने दाही दिशांना भराभर पांगणे या युक्त्या-प्रयुक्त्या महाराष्ट्रात मोगलांविरुद्ध शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी जशा योजल्या तशाच चिनी लाल सैन्याने हुनान, कियांगसी, फुकियेनच्या डोंगराळ रानात यशस्वीपणे अंमलात आणल्या. आणि एका महिन्याच्या आत कोमिन्टांगच्या प्रचंड सुसज्ज सैन्याचा पार धुव्वा उडविला. लाल सेनेचा हा पहिला महत्त्वाचा विजय होता. या लढ्यात त्यांना अतिशय आवश्यक असलेले दोन रेडिओ सेट्स् मिळाले. शिवाय अनेक बंदुकाही त्यांनी कोमिन्टांग सैनिकांकडून जिंकून घेतल्या.

पहिल्या निर्मूलन मोहिमेचा अशा रीतीने फज्जा उडाल्यावर चँग-कै-शेकने लगेच चार महिन्यांनंतर दुसरी मोहीम उघडली. या वेळी त्याने दोन लाखांचे सैन्य आपले युद्धमंत्री हो यिंग चिन याच्या आधिपत्याखाली सोव्हिएटवर पाठविले. लाल सैन्याची परिस्थिती या वेळी मोठी बिकट होती. आधीच्या निर्मूलन मोहिमेमुळे सोव्हिएटचे क्षेत्र कमी झाले होते. सैन्यसंख्या घटली होती. आणि शत्रू या

वेळी अधिक सुसज्ज होऊन आला होता. होने आपले कोमिन्टांग सैन्य सात वाटांनी सोव्हिएटवर घाडले. परंतु याही वेळी लाल सैन्याने आपल्या जुन्याच पद्धती यशस्वी-पणे वापरल्या. सातही तुकड्यांना वेगवेगळ्या दिवशी गाठून लाल सैन्याने पिटा-ळून लावले.

तिसऱ्या वेळी मुळीच विश्रांती न घेता जनरल चँग-कै-शेक स्वतः तीन लाख सैन्यानिशी चालून आला. पण त्यालाही धूळ खाऊन परत जावे लागले.

तिसऱ्या निर्मूलन मोहिमेनंतर मात्र लाल सैन्याला एक वर्षभर विश्रांती मिळाली. लाल सैन्य भराभर वाढू लागले. कोमिन्टांग सैन्यापासून जिंकलेली बरीच आधुनिक शस्त्रे आता लाल सैन्याजवळ जमा झाली होती. डिसेंबर १९३१ मध्ये चीनमधील सर्व सोव्हिएटस्चे अधिवेशन जुचित येथे भरले. सर्व सोव्हिएटस्च्या मध्यवर्ती सरकारचे अध्यक्ष म्हणून माओ-त्से-तुंगला व लाल सैन्याचा सरसेनापती म्हणून चुह्-तेहला निवडण्यात आले.

दरम्यान जपानी सैन्य मांचुरियामधून चीनमध्ये घुसू लागले होते. कोमिन्टांग सैन्य त्याला प्रतिकार करू शकले नाही. त्या वर्षभर यांगत्से नदीने आजूबाजूच्या प्रदेशाला पुराचा चांगलाच तडाखा दिला होता. चीनमधील इतरही भागात दुष्का-ळाने थैमान मांडले होते.

अशा स्थितीतच एप्रिल १९३३ मध्ये चँगने कम्युनिस्टांविरुद्ध चौथी निर्मूलन मोहीम उघडली. या मोहिमेत चँगने आपले सुमारे पाच लाखांचे सैन्य फेकले पण आधीच्या तीनही मोहिमांपेक्षा या मोहिमेत अधिक नामोहरम होऊन कोमिन्टांग सैन्याला परत फिरावे लागले. या मोहिमेत लाल सैन्याने कोमिन्टांगच्या दोन डिव्हजन्सना संपूर्ण निःशस्त्र केले, दोन कमांडर्सना कैद केले, एक डिव्हिजन पूर्ण नष्ट केली आणि आणखी एका डिव्हिजनला अर्धमेले करून टाकले. नुसत्या एकाच दिवसाच्या लढाईतच लाल सैन्याने कोमिन्टांगचे १३ हजार सैनिक कैद केले. चौथीही मोहीम लवकरच बारगळली.

### अखेरची मोहीम

चौथी मोहीम चँगने अगदी योजनापूर्वक आखली. कोमिन्टांग सैन्यात जर्मन सल्लागार होतेच. या वेळी त्याने जर्मन सैन्याचा भूतपूर्व सरसेनापती जनरल व्हॉन सेक्त याला या निर्मूलन मोहिमेचा प्रमुख सल्लागार नेमून त्याच्या हाताखाली सुमारे दहा लाख सैन्य या कामगिरीसाठी दिले.

जनरल व्हॉन सेक्तने या वेळी कुठलीही कसूर करावयाची नाही असे ठरविले. त्याने पद्धतशीरपणे कियांगसी सोव्हिएटभोवती एकामागे एक अशा तीन संरक्षक फळ्या उभारल्या. या फळ्या म्हणजे अंतरा अंतरावर बांधलेले सिमेंट कॉंक्रीटचे खंदक होते. प्रत्येक खंदकामध्ये अन्नाच्या व दारूगोळ्याच्या भरपूर साठ्यानिशी कोमिन्टांगची एक तुकडी सतत सुसज्ज बसलेली असे. या जबरदस्त फळीमुळे

लाल सैन्याला आपल्या गनिमी हालचाली करणे कठीण जाऊ लागले. पहिली फळी पूर्ण बांधून झाल्यावर कोमिन्टांगने सोव्हिएट तळाच्या अधिक जवळ अशी दुसरी व त्यानंतर अधिकच जवळ अशी तिसरी फळी पक्की बांधली. अशा रीतीने कोमिन्टांग सैन्य आपले पाश हळूहळू सोव्हिएट तळाभोवती घट्ट आवळीत होते. अशा एका पाठोपाठ एक फळ्या उभारून लाल सैन्याला कोंडीत पकडून ते संपूर्ण नेस्तानाबूत करण्याची व्हॉन सेक्तची योजना अतिशय प्रभावी होती. झटपट काही केले नाही तर आपली शंभर वर्षे पूर्ण भरली याची लाल सैन्याला आता खात्री झाली.

शिवाय कोमिन्टांग सैन्याजवळ पाश्चात्य राष्ट्रांकडून मिळालेली अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, लढाऊ विमाने व दारूगोळा होता. त्यांच्याजवळ अन्नधान्याचा मोठा साठा होता, औषधोपचार करायला डॉक्टर होते, वाहने होती. लाल सैन्याजवळ यांपैकी काहीच नव्हते.

याच सुमाराला कोमिन्टार्नतर्फे एक लष्करी सल्लागार सोव्हिएटमध्ये पाठविण्यात आला होता. माओ हा जरी मध्यवर्ती सोव्हिएट सरकारचा अध्यक्ष असला तरी माओ केवळ नावापुरता सत्ताधारी आहे. खरी सत्ता आमच्याच हाती आहे, असे भासविण्याचा प्रयत्न त्या वेळचा चिनी कम्युनिस्ट पक्ष करीत असे. या पक्षाच्या मध्यवर्ती समितीचा माओच्या धोरणाला अद्यापही विरोध होता व त्यामुळे नव्याने आलेला कोमिन्टार्नचा लष्करी सल्लागार या मध्यवर्ती समितीवर जास्त विसंबून होता.

हा सल्लागार म्हणजे पूर्वीचा जर्मन सेनाधिकारी होता. कम्युनिस्ट झाल्यानंतर त्याने मॉस्कोच्या रेड अॅकेडमीमध्ये शिक्षण घेतले होते व रशियन लाल सैन्याच्या काही तुकड्यांचे आधिपत्यही त्याने केले होते. चीनमध्ये आल्यावर त्याने ली तेह नाव धारण केले होते. युद्धाच्या दोन्ही बाजूंचे सल्लागार असे जर्मन अधिकारीच होते.

### पाश आवळले

ली तेहने लाल सैन्याला साधा बचावात्मक पवित्रा घेण्याचा सल्ला दिला. त्यामुळेच सारा घोटाळा झाला. लाल सैन्याने एका ठिकाणी स्थिर बचावाचा पवित्रा घेतल्याने कोमिन्टांगच्या प्रचंड सैन्याने पद्धतशीरपणे आजूबाजूचा सारा प्रदेश बेचिराख करण्यास सुरुवात केली. सोव्हिएट तळाभोवतालच्या क्षेत्रातील गनिमी शेतकऱ्यांना एकतर पकडून ठार मारण्यात आले किंवा हाकलून देण्यात आले. सोव्हिएट तळाच्या सीमेवर विमानांतून सतत बॉंबहल्ले आणि मशीनगन्सचे हल्ले सुरू झाले. या मोहिमेत सोव्हिएटस्‌मधील सुमारे दहा लाख लोक ठार केल्याचा दावा प्रत्यक्ष कोमिन्टांगनेच केला. खरा आकडा यापेक्षा जास्त असला पाहिजे.

भोवतालचे भक्कम संरक्षित वर्तुळ छोटे होत होते. अशा परिस्थितीत आणखी काही दिवस काढणे आत्मघाताचे होते. शेवटी ही कोंडी फोडून तिच्याबाहेर पडून

चीनमध्ये दुसऱ्या कोठल्यातरी योग्य जागी नवा तळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

लाल सैन्याच्या एका दलाला व कियांगसीमधील प्रमुख सोव्हिएटच्या लोकवस्तीला त्याप्रमाणे गुप्तपणे इशारे देण्यात आले. ऑक्टोबर १९३४ च्या शेवटपर्यंत रोज रात्री हालचाली करीत सोव्हिएटच्या जंगलात सुमारे १ लाख सैनिक जमले. आणि एका रात्री या सैन्याने एकाएकी कोमिन्टांगच्या संरक्षक फळीवर जोराचा हल्ला करून फळीला एक मोठे भगदाड पाडले.

आणि या भगदाडातून जवळ जवळ सारे सोव्हिएट राज्य बाहेर पडले. लाखो बैलगाड्या, गाढवे, घोडी, मुले, बाया या तुटलेल्या फळीतून बाहेर निघाली. शस्त्रे, दारूगोळा, यंत्रे, सरकारी कागदपत्रे, अन्नधान्य, पैसे, कचेऱ्या, छपाई यंत्रे, घोड्यागाढवांच्या पाठीवर लादून नेण्यात आली. हाती जे जे सापडेल, जे उपयोगी असेल आणि जे हलविता येईल असे सामान घेऊन लाल सैनिकांची कुटुंबे, मुलेबाळे, बाया बाहेर पडू लागली सोव्हिएटमधील सारी खेडी व शहरे भकास दिसू लागली. सारेच सोव्हिएट फिरतीवर होते.

मागावर असलेल्या शत्रू सैनिकांना हुलकावण्या देत, विमानातून सतत होणारा बॉम्बचा व मशीनगन्सचा मारा चुकवीत घनदाट जंगलामधून धोक्याच्या पहाडी मार्गावरून ही लाल सेना आपल्या अवजड आणि विचित्र लवाजम्यासह मार्ग आक्रमण करू लागली. नेमके कोठे जायचे हे ठरले नव्हते. किती दिवस भटकावे लागणार याचा अंदाज नव्हता. भविष्य फार निराशाजनक होते. आणि अशाही स्थितीत जीवाच्या आकांताने ते पळत होते.

आधुनिक चीनच्या इतिहासातील सुप्रसिद्ध 'लाँग मार्च' सुरू झाला होता.

[अपूर्ण]


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.




ॲड. माधव कानिटकर

"**म**ग ? तुमच्यापैकी कुणालाही हे काम जमणार नाही ?" संतापान डोळे गरगरा फिरवीत कर्तारसिंगाने त्याच्याभोवती कोंडाळे करून बसलेल्या लोकांना प्रश्न केला. विजेच्या कडकडाटाने आसमंत दणाणून सोडावे तसा कर्तारसिंगाचा चढलेला आवाज एकामागून एक जहाल शब्दांचा मारा सहकाऱ्यांवर करीत होता. "निमकहराम कुठचे ! तुम्ही काय माणसं आहात का जनावरं आहात ? आणि म्हणे गावातले लोक तुम्हांला घाबरतात ! ते तुम्हांला खुनी, दरोडेखोर समजतात. आत्ता येऊन त्यांनी तुम्हांला पाहचला पाहिजे, शेळपट कुठचे !"

बोलता बोलता कर्तारसिंग उभा राहिला. ज्या खाटेवर बसून तो बोलत होता ती त्याने लाथेने दूर सारली. कर्तारसिंगाच्या धिप्पाड देहाकड त्याचे सहकारी मुकाटपणे पाहत होते. त्याच्या बारीक सारीक हालचाली भीतीने टिपत होते. त्यांच्यापैकी एखाद्याने पोलीस

# पंजाबमधील एक गाजलेला खून खटला

## लेखांक पहिला

स्टेशनवर जाऊन पोलिसांच्या गुप्त डायरीतील कर्तारसिंगाची माहिती वाचली असती तर पोलिसांची बिनचूक वर्णनशैली पाहून तो थक्क झाला असता !

'कर्तारसिंग, ग्रामपंचायतीचा सभासद, वय ४२ वर्षे, उंची ६॥ फूट, रंग गोरा, डाव्या डोळयाने आंधळा, लहानपणी झालेल्या एका अपघातात डावा डोळा गमावल्याचे समजते. काळयाभोर दाढीच्या केसांत मध्येच पांढरटपणाची झाक, दाढी सरळ व व्यवस्थित विंचरलेली, देहयष्टी धिप्पाड. चालताना पहिलवानासारखा डामडौलाने चालतो, चाल मंद, बोलण्यात हुकमत पण आवाज मात्र जरूरीपेक्षा जास्त मोठा. कधी कधी गांजा ओढतो, दारू मात्र नेहमीच. उर्दू चांगला बोलतो. कमरेभोवती गाठ मारण्याच्या पद्धतीने स्वच्छ पांढरे धोतर नेसून पुढे सोगा सोडतो ! खादीचा हलका शर्ट आणि हिरवा पटका हा नेहमीचा वेष !'

आतादेखील कोंडाळे करून बसलेल्या लोकांना, ते पोलिसांच्या डायरीतील त्याचे वर्णनच जणू काही सजीव होऊन आपल्यासमोर वावरत आहे, असा भास होत होता ! आपल्या प्रत्येक सहकाऱ्यापुढे आळीपाळीने उभा राहून कर्तारसिंग त्यांची कडक शब्दांत संभावना करीत होता. रागाच्या भरात त्याचा उजवा हात चाबूक मारताना हलवतात तसा आपोआप हलत होता. " छगनसिंग ! पोलिस मागे लागले की पुन्हा कधी माझ्याकडे पाया पडत येऊ नकोस ! ... ......आणि तू गुरनामसिंग ! गेल्या वेळच्या दरवडयात तुझी काय स्थिती झाली होती, हे आता तुला आठवत नसेलच ! जखमांनी चिघळलेलं, रक्तानं भरलेलं हे तुझं घाणेरडं शरीर आठ दिवस मी माझ्या घरात ठेवलं होतं !......और तुम जोगिंदरसिंग ! कुत्ता कहीका ! आता ये कधी माझ्याकडे पुन्हा आणि म्हण की ' सरदारजी ! माझी ही एवढी बंदुक कुठेतरी लपवून ठेवा हो ! पोलिस माझ्या मागे लागल्येत. पोलिसांची वायरलेस माझा मागोवा घेत फिरत आहे ! त्यांना माझा पत्ता समजला आहे हे नक्की ' भडव्यांनो ! पोलिस मागे लागले की माझ्याकडे येता......इथे येऊन खाता-पिता......... "

अचानक झोपडीचा दरवाजा उघडला गेला ! करमसिंग आणि कोणीतरी दोन

अनोळखी माणसे त्याच्याबरोबर दरवाजातच उभी होती ! नव्या आलेल्या साथी-दारांना स्वत: कर्तारसिंगदेखील ओळखत नव्हता. दोन वर्षांपूर्वी टोळीत आलेल्या आपल्या विश्वासू सहकाऱ्याकडे करमसिंगाकडे–पाहून त्याचे त्यांनी हसून स्वागत केले. क्षणभर तो आपला अनावर संताप विसरून गेला !

करमसिंग ही असामी साधीसुधी नव्हती. शरीराने, नावलौकिकाने आणि हुशारीने तो आपल्या धन्यापेक्षा यत्किंचितही कमी नव्हता ! मजबूत बांधा, धिप्पाड देहयष्टी, शरीरांच्या मांसल भागांनी आकार घेतलेले ! त्याने डोक्यावरचे केस बारीक कापलेले होते. दाढी गुळगुळीत केलेली होती. एवढाच काय तो फरक ! काळ्याभोर मिशांचे आकडे त्याने वर वळवले होते. रुंद चेहरा आणि पिंगट डोळ्यांवर असलेल्या जाडजुड भुवया यामुळे त्याच्या चेहऱ्यावर नैसर्गिक क्रौर्य आले होते ! तो हसत असताना त्याचे पांढरे शुभ्र दात थोडे पुढे असल्याचा भास होई आणि पाहणाराला तो अधिकच भयानक दिसत असे ! वयाची पस्तिशी ओलांडण्यापूर्वीच त्याने मिलिटरीतील ६ वर्षांची नोकरी करून राजीनामा दिला होता ! अनेक गावांतल्या खेडुतांची किरकोळ कामे करून त्याने थोडेफार ' वजन ' मारले होते. पोलिसांच्या काळ्या यादीत त्याचे नाव प्रमुख होते. एका खुनाशी आणि एका दरवड्याशी त्याचा जवळचा संबंध होता. हे नक्की, पण पुराव्याअभावी पोलिस त्याच्यावर खटला भरू शकत नव्हते ! कुठलाही भयंकर गुन्हा घडला आणि अजिबात पुरावा मिळाला नाही तर पुरावा मिळत नाही याचाच अर्थ तो गुन्हा करमसिंगने केलेला असावा असा दाट संशय पोलिसांच्या मनात येत असे ! चिक्कार दारू पिऊन बायकांवर बलत्कार करणे हा गुन्हा आहे, हे तरी त्याला ठाऊक होतं की नाही कोण जाणे ! नखशिखान्त खाकी कपडे घालणाऱ्या या करमसिंगावर संस्कार-देखील तसेच झालेले होते ! वडिलांच्या हयातीतच त्याची आई तिच्या प्रियकरा-कडे राहायला गेली होती ! एक भाऊ ' साधू ' बनून घरातून परागंदा झाला होता ! वयाच्या १० व्या वर्षी करमसिंग घरातून पळाला ! अनेक जमीनदाराकडे त्याने लहानसहान नोकऱ्या केल्या. नोकरीत काही मजा नसते हे त्याला जरूरीपेक्षा जास्त लवकर समजलं ! त्यापेक्षा धंदा बरा !... आणि त्याने धंदा सुरू केला ! जेव्हा जेव्हा पशांची अडचण भासली–आणि परिस्थिती अनुकूल होती– तेव्हा तेव्हा चक्क चोऱ्या करून त्याने आपल्या गरजा भागविल्या होत्या !

दोन वर्षांपूर्वी एका धाडसी दरवड्याच्या कामात कर्तारसिंगासारख्या ' अनुभवी ' माणसाची मदत मागण्यासाठी तो प्रथम त्याच्याकडे आला. त्याचे पिंगट डोळे आणि चेहऱ्यावरचे विशिष्ट भाव पाहून पहिल्याच भेटीत कर्तारसिंगाने त्याचा चेहरा हेरला होता ! त्याला चांगली मदत दिली होती ! पोलिसांनी दाखल केलेल्या एका मोठ्या केसमध्ये काय बचाव घ्यायचा याचे त्याला मार्गदर्शन करून कर्तारसिंगाने त्याला ' निर्दोष ' सोडवून आणला होता !......आणि तेव्हापासून

आजपर्यंत कृतज्ञतेने करमसिंग हा कर्तारसिंगाचा प्रामाणिक व विश्वासू सहकारी होता ! आपल्या 'गुणांचा' प्रभाव पाडून त्याने टोळीत दुसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकावले होते !

......आणि म्हणूनच करमसिंगाला दरवाज्यात पाहिल्याबरोबर कर्तारसिंगाचे डोळे चमकले ! त्याला हवा असलेला 'माणूस' आलेला होता (!) नवीन आलेल्या दोन सहकाऱ्यांकडे पाहून तो पुन्हा बोलू लागला. पहिल्यापासून सगळी हकीकत त्यांना समजावून सांगू लागला. "हरजितसिंग–गज्जनसिंग आणि त्यांची माणसे यांच्याबद्दल ऐकलंच असेल तुम्ही ! " आपण घेतलेला निर्णय कसा बरोबर आहे याची पुन्हा एकदा स्वतःचीच खात्री पटवून घेण्यासाठी त्याने अनेक प्रसंगांची उजळणी सुरू केली. आपले कट्टर दुष्मन हरजितसिंग आणि गज्जनसिंग यांच्या पापांची यादी अनोळखी सहकाऱ्यांना सांगत असताना नकळत त्याचा उत्साह वाढला, आवाज आपोआप मोठा झाला. तिथे जमलेले सर्वजण स्तब्ध होऊन ऐकू लागले. त्याचे वाक्य समजणे कठीण व्हावे इतक्या जलद गतीने कर्तारसिंग सांगत होता– "ह्या– ह्याच हरजितसिंगाच्या बापाने ३० वर्षांपूर्वी माझ्या वडिलांच्या टोळीतल्या नन्दूचा खून केला. आज इतकी वर्षं झाली, पण नन्दूची आठवण झाली की, त्याचं मरण आठवतं आणि माझ्या अंगाची आग होती नुसती ! त्या गज्जनसिंगाने तर एकदा माझ्या आईवरच हात टाकला होता ! १९४३ साल असेल. मी एकटाच जंगलातून चाललो होतो, जवळ बंदूक नाही की काही नाही– आणि अचानक हरजितसिंगाने त्याच्या दोस्तांसह माझ्यावर हल्ला केला होता ! जीव घेऊन पळालो म्हणून आज तुम्हांला इथे दिसतो आहे ! त्यानंतर मला वाटतं एक वर्षाने हरजितसिंगाने माझ्यावर दुसरा हल्ला केला ! २४ तासांच्या आत त्याचा बदला घेणार होतो ! पण पोलिसांनी आमच्या दोघांकडून चांगल्या वागणुकीची हमी म्हणून लगेच ५–५ हजार रुपयांचा जामीन घेतला. रक्कम जप्त होऊ नये म्हणून मी त्या वेळी स्वस्थ बसलो. शिवाय त्यानंतर आमची समझोत्याची बोलणी झाली, पण त्याच्या शब्दाची किंमत त्याला नाही ! आज एक बोलेल तर उद्या दुसरंच काहीतरी करील असला आहे तो हरजितसिंग ! "

नकळत कर्तारसिंग खाटेसमोर फेऱ्या घालू लागला. काही सेकंद थांबून त्याने आकाशाकडे नजर लावली आणि एकदम गिरकी घेऊन त्याने पुन्हा सुरवात केली– "आणि माझी बायको ऽऽ– "

" कोण धन्नो ? "

"ती बायको आहे का माझी गाढवा ! ती गुलछडी अजून माझ्याकडे आहे ऽ ऽ म्हणून थोडंफार सुख लाभतंय ! मी माझ्या बायकोविषयी सांगत होतो–तिने स्वतःचं तोंड काळं करून घेतलं आणि माझ्या तोंडाला काळं फासलं ! हरजितसिंगाचा दोस्त निरंजनसिंग याने तिला फितवली ! ती पण त्याच्यावर भाळली ! मला

सोडून त्याच्याकडे जाऊन राहिल्ये ती × × × ! ”

स्वतःची बायको—मग ती कशीही असेना— आपल्याला सोडून दुसऱ्या पुरुषावर बेहद्द खूष झाली तर पुरुषाला केवढा अपमान वाटतो, हे फक्त पुरुषांनाच कळेल !

कर्तारसिंगाचा इतका संताप होण्याचे तसेच एक नवीन कारण घडत होते ! ग्रामपंचायतीचा तो गेल्या वर्षापर्यंत सरपंच होता. गावात जाता-येता मुजरे झडत होते. गावकीचा पैसाअडका हातात खेळत होता. गावातल्या कुणावरही तो हुकमत गाजवू शकत होता.

पण ..... १९५३ च्या जूनमध्ये मोघा ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या आणि......आणि हरजितसिंगाने निवडणुकीत कर्तारसिंगाचा चीतपट पराभव केला! कर्तारसिंगाच्या अंगाचा तिळपापड झाला होता. दुसरा कोणी सरपंच म्हणून निवडून आला असता तर कर्तारसिंगाला फारसे दुःख झाले नसते. पण हरजितसिंग ? ......त्याचा कट्टर दुष्मन ? त्याची सरपंच म्हणून झालेली निवड म्हणजे निवडणुकीतल्या पराभवाच्या जखमेवर मीठ !

पण झालं हे काहीच नव्हतं असा जबदरदस्त मीमटोला हरजीतसिंगाने निवणुकीनंतर मारला. ग्रामपंचायतीच्या पहिल्याच सभेत “कर्तारसिंगाने ग्रामपंचायतीचा सरपंच या नात्याने हजारो रुपयांची अफरातफर केली आहे व ही गोष्ट बाहेर पडू नये म्हणून माजी सरपंच या नात्याने त्याच्याकडे असलेली रक्कम त्याने अजून माझ्याकडे सुपूर्द केलेली नाही, ” असा घडघडीत आरोप त्याच्याविरुद्ध हरजितसिंगाने ग्रामपंचायतीच्या पहिल्याच सभेत नवीन सरपंच या नात्याने केला !

ना कुणाच्या अध्यात ना मध्यात अशा वृत्तीच्या सर्वसामान्य गावकऱ्यांची कुचंबणा होऊ लागली. त्यांनी सरकारकडे अर्ज पाठविला की, “ हे पंचायत आम्हांला नको ? आपसातले हेवेदावे, मत्सर, आरोप-प्रत्यारोप या मानगडीत गावाचे कल्याण कवडीचे होत नसून सरकारने झालेली निवडणूक रद्दबातल ठरवावी. पुन्हा एकदा निवडणूक घ्यावी. निवडून आलेल्या पंचांवर सरकारने नियंत्रण ठेवावे ! ”

सरकारकडे अशा तऱ्हेचा अर्ज केला गेलेला आहे, याची कर्तारसिंगाला माहिती होती. पण हा अर्ज त्याला मनःस्ताप देणारा ठरेल याची मात्र त्याला कल्पना नव्हती ! गावकऱ्यांच्या या अर्जाने हरजितसिंगाला नामी संधी मिळवून दिली होती ! “ निवडणुकीत आपटी खाल्ल्यामुळे कर्तारसिंगानेच त्याच्या हस्तकांशी संगनमत करून हा अर्ज सरकारकडे पाठवला आहे, ” असा घडाकेबाज प्रचार हरजितसिंगाने सुरू केला ! त्या उलट “ त्या अर्जाशी माझा काही संबंध नाही, ” असे स्पष्टीकरण कर्तारसिंगाने सुरू केले ! पण पराभुताच्या स्पष्टीकरणाला विचारतो कोण ? कोणी त्याच्या अपरोक्ष काही बोलत, कुणी त्याच्याकडे पाहून कुत्सितपणाने हसत. तो जात असला की हरजितसिंगाच्या टोळीतले लोक उगाचच एकमेकांना “ काय सरपं ऽऽऽऽ च ! ” म्हणून हाक मारीत ! कर्तारसिंगाची सगळीकडे



"......और तुम जोगिंदरसिंग ! कुत्ता कहीं का ! " ......कर्तारसिंग बोलत होता

उपेक्षा सुरू झाली. आणि मग मात्र कर्तारसिंगाचा स्वत:वरचा ताबा सुटला. हरजितसिंगाला या जगातून नाहीसा करून टाकला पाहिजे, या विचाराने त्याच्या मेंदूचा कबजा घेतला. त्या कामासाठी त्याला योग्य माणूस हवा होता !

सतत बोलण्याने व अनावर रागाने कर्तारसिंगाला धाप लागली होती. एखाद्या भ्रमिष्ट माणसाप्रमाणे आपल्यापुढे सोडलेल्या मोग्याची खालची टोके उजव्या-डाव्या अंगाने वरून त्याने धोतर वर केले ! आपल्या जाडजूड, गोऱ्या मांड्यांचे प्रदर्शन करीत कर्तारसिंग पुन्हा आपल्या खाटेवर बसला. आतापर्यंतच्या बोलण्यात त्याने

'सभा' जिंकली होती. "असं असेल तर तुमचा विचार बरोबर आहे," असा भाव प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उमटू लागला होता, पण उगाच कोणाच्या मनात शंका नको म्हणून कर्तारसिंग पुन्हा तावातावाने सांगू लागला, "... आणि दोन दिवसांपूर्वी काय झालं ? तू होतास तेव्हा करमसिंग ! तू पाहिलंस काय झालं ते ! भोला बदमाष आणि त्याच्या दारुड्या मित्रांनी मला भर बाजारात शिव्या दिल्या ! कुणी दारू पाजली त्यांना ? कुणी शिव्या घालायला सांगितल्या त्यांना ? हजरतसिंगाशिवाय दुसरं कोण ! तिथल्या तिथेच एकाला तरी खलास करून टाकणार होतो ! पण मध्येच एक कॉन्स्टेबल येऊन टपकला आणि त्यांना घेऊन गेला म्हणून वाचले साले ! काय चालवलंय काय हजरतसिंगाने ! माझा सत्यानास करण्यासाठीच जन्माला आलाय की काय ? एकेकाळचा सरपंच मी ! पण आता. जिथे तिथे माझा अपमान...गावात तोंड दाखवायची लाज वाटते. ...ते काही नाही...!"

शेवटचे वाक्य उच्चारताना कर्तारसिंगाने करमसिंगाकडे साभिप्राय पाहिले. त्याचे बोलणे एकवेळ शांतपणे ऐकून घेणाऱ्या करमसिंगाला आता मात्र राहवले नाही. झटकन् पुढे होऊन तो कर्तारसिंगाच्या पायांजवळ येऊन बसला आणि त्याच्या चेहऱ्याकडे पाहत त्याने शपथ घेतली.

"सरदारजी ! मी तुमचं काम करायला तयार आहे ! ही दोन माणसं मी आणलीच आहेत. आणखी एकाला बोलून ठेवलं आहे, तो आत्ता येईलच इतक्यात...."

[ पुढील अंकी चालू ]

[ पंजाब हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश जी. डी. खोसला यांच्या 'A Judge's Note-Book' मधील "An Imperfect Alibi" चे स्वैर रूपांतर. ]

फ्री – मोफत – फ्री

मुंबई वरळी मटका डेली चार्ट

दररोज बरोबर / आजच लिहा

महालक्ष्मी फोरकास्टिंग सर्व्हिस

ब्रांच पोस्ट ऑफिस गुन्डिआली

सब-पोस्ट–मांडवी, जिल्हा कच्छ, गुजराथ राज्य



# आपली आर्थिक उन्नती
# एक दिलासा

भारताच्या शेतीच्या व औद्योगिक क्षेत्रातील गेल्या १७-१८ वर्षांतील प्रगतीचा आढावा डॉ. के. एन्. राज यांनी पाटणा येथे दि. २३ व २४ जानेवारी १९६५ रोजी दिलेल्या व्याख्यानांत घेतलेला आहे आणि आर्थिक विकासाची वाटचाल करीत असताना पाळावयाच्या शिस्तीची व पथ्याची कल्पनाही दिलेली आहे. वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून केलेले, डॉ. राज यांच्यासारख्या आर्थिक क्षेत्रातील अधिकारी व्यक्तीचे मार्गदर्शन निश्चितच उपयुक्त आहे.

पहिल्या व्याख्यानात वर्तमानकालीन पेचप्रसंग व शेती यांचा विचार केलेला आहे. डॉ. राज यांच्या मते " १९५०-६३ या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग योजनांतील संकल्पांप्रमाणे व समाधानकारक आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात राष्ट्रीय उत्पन्न दरसाल ४½ टक्क्यांनी वाढले व चौथ्या योजनेतील वाढ ६ टक्क्यांपेक्षा जास्त होईल. मात्र हा वेग नियोजित भांडवल गुंतवणूक व उपभोगाचे मान स्थिर ठेवण्यास अपुरा आहे. शिवाय लोकसंख्येच्या वाढीचा विचार करता विकासाचा वेग ५ टक्के ते ६ टक्के इतका हवा.

अन्नधान्याचा अपुरा साठा, वाढता संरक्षणखर्च व वाढती लोकसंख्या यांमुळे साधनसामग्रीच्या उपयोगावर जादा ताण पडतो. वाढत्या खर्चामुळे व वाढत्या मिळकतीमुळे ग्राहकोपयोगी वस्तूंची मागणी वाढते आणि मर्यादित पुरवठ्यामुळे भाववाढीची परिस्थिती अटळ होते. अधिकृत आकडेवारीनुसार अन्नधान्याच्या

उत्पादनात फारशी घट झालेली दिसून येत नाही तर लोकसंख्या अन्नधान्याच्या उत्पादनापेक्षा जास्त वेगाने वाढली. व्यापाऱ्यांची साठेबाजी, झोनल सिस्टिम, वाढती मागणी यांमुळे अन्नधान्याच्या किंमती वाढल्या व टंचाई निर्माण झाली परंतु सापेक्षतः या किंमती कमीच होत्या व अन्नधान्याच्या उत्पादनास प्रोत्साहन देण्यास योग्य नव्हत्या. म्हणून अन्नधान्याचे भाव फार खाली घसरू न देणे हे सरकारचे दीर्घकालीन उद्दिष्ट असावे, असे डॉ. राज सुचवतात.

परंतु त्यांनी दाखवून दिल्याप्रमाणे सरकारची प्रवृत्ती जमिनीच्या हक्कसंबंध प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याची व केवळ तंत्रशाही भूमिका घेऊन कधीही अंमलबजावणी न होणाऱ्या घोषणांचा उद्घोष करण्याची आहे. म्हणून शेतीविषयक उत्पादनाची प्रगती केवळ तंत्रशाही धोरणाने होणार नाही तर मोजके आणि अनुरूप संस्थात्मक बदल घडवून आणण्याची नितांत आवश्यकता आहे. कारभारयंत्रणेचा सुस्तपणा, संकुचित पक्षहित व हितसंबंधांचे राजकीय दडपण यांमुळे अशा तऱ्हेची उपाययोजना केली जात नाही. तरीसुद्धा डॉ. राज यांच्या मते शेतीच्या क्षेत्रात झालेली प्रगती ' उपेक्षणीय ' नाही. मात्र दारिद्र्य व बेकारी यांवर जोरदार आघात करण्याइतकी ताकद शेतीधंद्यात निर्माण झालेली नाही. शेतीव्यवसायातील थोड्याफार अपयशास राजकीय परिस्थिती जबाबदार आहे.

### आत्मविश्वासाचा अभाव एवढीच उणीव

देशाच्या नियोजित भांडवलगुंतवणुकीचा मोठा भाग भारी उद्योगधंद्यांकडे जातो. डॉ. राज यांच्या मते दीर्घकालीन पूर्ण होणाऱ्या व चालू उत्पादनात फारशी भर न घालणाऱ्या प्रकल्पांच्या आधिक्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग अपेक्षेपेक्षा कमी आहे हा समज चुकीचा आहे. त्याचप्रमाणे भारी उद्योगधंद्यांच्या वाढीच्या योजना साकार व्हावयास नेहमीच वेळ लागतो हेही म्हणणे बरोबर नाही.


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड
राजगड पुरंदर आग्रा
मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

१९५६ सालापासून तीन योजनांतील औद्योगिक विकासाचा वेग उल्लेखनीय आहे. १९५१-६३ या कालात जुने उद्योगधंदे प्रतिवर्षी ३ टक्क्यांनी (चक्रवाढीने) व नव्या उद्योगसमूहातील उद्योगधंदे प्रतिवर्षी १० टक्क्यांनी (चक्रवाढीने) वाढले. शेतीचा अपुरा विकास, कच्च्या मालाचा मर्यादित पुरवठा, कमी मागणी व वाढती स्पर्धा यांमुळे जुन्या उद्योगधंद्यांच्या वाढीचा वेग कमी झाला. मात्र नव्या व भांडवली उद्योगधंद्यांच्या वाढीस मागासलेल्या देशांत भरपूर वाव असूनसुद्धा भांडवलाच्या अपुरेपणामुळे मर्यादा पडते. तरीही नवीन उद्योगधंद्यांचा विकास सध्याच्या वेगाने झाल्यास एकूण औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा वेग दरवर्षी १० टक्क्यांपर्यंत नेणे शक्य होईल. त्यासाठी भांडवल गुंतवणुकीचा वेग व अंतर्गत बचत (परदेशीय मदतीचा वास्तव अंदाज घऊन) वाढवावी लागेल.

१९५०-६० या शतकात देशी बचतीचे प्रतिवर्षी प्रमाण राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या २० टक्के ते २५ टक्के एवढे वाढले आहे. आणि डॉ. राज यांच्या मते या कालात देशातील भाववाढ, खूपच मर्यादित होती. भारतातील उत्पन्न वाटपही बचतीचा सीमान्त वेग वाढण्यास अनुरूप आहे. संरक्षणखर्चातील वाढीमुळे झालेल्या भाववाढीतून अधिक भांडवल गुंतवणुकीचा इष्ट परिणाम साधता येईल. निर्यात व्यापाराच्या उत्पन्नामुळे आयात निर्यात व्यापारातील चालू तूटही फारशी नाही. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीपैकी ¼ बचत केली जात आहे व त्यासाठी भरमसाट भाववाढही होऊ द्यावी लागत नाही. निर्यातवाढीची क्षमताही वाढताना दिसत आहे आणि आतापर्यंतच्या अनुभवावरून निराश होण्याचे काहीएक कारण नाही.

उत्पन्नवाढीचा वेग उंचावला, औद्योगिक पाया अधिक विस्तृत झाला तर परदेशी चलनाची कमतरता यापुढे जाणवणार नाही. शेतीविकासाचा वेग प्रतिवर्षी सुमारे ५ टक्के करता आला, निर्यातवाढीचा वेग सांभाळला, ¼ बचत केली तर परदेशी भांडवलाची गरजही पूर्णपणे भागवता येईल व त्याचे राजकीय आणि आर्थिक दृष्टींनी होणारे अनिष्ट परिणाम टाळता येतील. बरीचशी साधनसामग्री देशातल्या देशात उभी करण्याची आपली कुवत आहे आणि संरक्षण खर्चाचा वाढता बोजा सहन करूनही अर्थव्यवस्था अधिक स्थिरतेसह प्रगतीच्या दृष्टीने मार्गक्रमण करू लागलेली दिसते.

डॉ. राज यांच्या दोन्ही व्याख्यानांतून त्यांचा भारताच्या आर्थिक प्रगतिविषयक दृष्टिकोन 'आशावादी' आहे असे दिसून येते. आणि हेच मत अमेरिकेचे दिल्लीतील वकील मि. चेस्टर बौल्स यांनीही नुकतेच व्यक्त केले आहे. या दोघांच्या मतांनुसार देशाची आतापर्यंतची आर्थिक प्रगती अगदीच असमाधानकारक नाही असे म्हणण्यात एकप्रकारचे नकारात्मक समाधान जरी मिळण्यासारखे असले तरी प्रगती समाधानकारक आहे, असे निश्चितपणे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणारे नाही. आर्थिक प्रगतीच्या मार्गातील सर्वांत महत्त्वाचा अडथळा म्हणजे आत्म-

विश्वासाचा अभाव, हे मत मि. बौल्स व डॉ. राज यांनी व्यक्त केले आहे. पण त्याचबरोबर मि. बौल्स यांनी याचीही जाणीव दिलेली आहे की, " आज हिंदपुढे जेवढे मोठे प्रश्न आहेत त्यांहून अधिक फारच थोडया राष्ट्रांपुढे असतील. आतापर्यंतची आर्थिक क्षेत्रातील भारताची कामगिरी लक्षात घेता मि. बौल्स यांना विश्वास वाटतो की, वाढलेले उत्पादन, सामाजिक आणि आर्थिक न्यायाबद्दलची वाढती कदर यांच्या आधारावर हिंदला राजकीय स्थैर्याचे आणि आर्थिक प्रगतीचे नवे युग सुरू करता येईल. मात्र त्यासाठी सतत प्रयत्न हवेत आणि धोरणे वास्तववादी हवीत. "

## विपरीत अनुभव

याच वास्तववादी व व्यावहारिक धोरणांचा पुरस्कार डॉ. राज यांनी केलेला आहे. मात्र ही व्यवहारवादी भूमिका आर्थिक प्रश्नांच्या बौद्धिक आकलनावर आधारलेली पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. म्हणूनच वस्तुनिष्ठ पद्धतीने प्रत्येक प्रश्नाच्या राजकीय आणि आर्थिक बाजूंचा परामर्श त्यांनी घेतला आहे. उपलब्ध आकडेवारीचा आधारही त्यांनी आपल्या विधानांना पुष्टी देण्यासाठी घेतलेला आहे. तरीसुद्धा डॉ. राज यांचे विचार आकडयांत गुरफटलेले व एकांगी वाटतात. एखाद्या चित्राची चांगली बाजूच लक्षात घेऊन सर्व गोष्टींचे विवेचन केल्यासारखे दिसते. याप्रमाणे अल्पसंतोषी वृत्ती ठेवल्यास कशातही समाधान मानता येण्यासारखे आहे.

ज्या आर्थिक धोरणांचा व योजनांचा ते पुरस्कार करतात, त्यांना तत्त्वत: विरोध करता येणार नाही. पण त्या योजनांची व तत्त्वांची अंमलबजावणी सदोष व अपूर्ण असेल तर त्याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेवर झाल्याखेरीज राहणार नाहीत.

अन्नटंचाई, घरांची टंचाई, बेकारीचा प्रश्न, परकीय हुंडणावळीचा प्रश्न, निर्यात वाढीचा प्रश्न, वाढती लोकसंख्या, वाढती भाववाढ, महागाई या कठोर वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. नुकतेच झालेले रुपयाचे अवमूल्यन ही देशाच्या आर्थिक व राजकीय दिवाळखोरीची निशाणी आहे.


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

जागतिक बँकेने आर्थिक विकासासाठी कर्ज देताना रुपयाचे आणखी अवमूल्यन करण्याविषयी दडपण आणलेले आहे. शिवाय केलेल्या अवमूल्यनाचा निर्यातीवर काहीही अनुकूल परिणाम झालेला नाही. अंतर्गत अर्थव्यवस्था ही सर्व बाजूंनी डळमळीत झालेली आहे. पंचवार्षिक योजनांवरील वाढता खर्च, वाढता संरक्षण-खर्च, उत्पादनाच्या साधनसामग्रीचा अपव्यय, सदोष शासनयंत्रणा व त्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीस लागणारा विलंब यांमुळे सामान्य माणसाची आर्थिक प्रगतीविषयीची प्रतिक्रिया निराशावादीच राहणार. त्यांची फळे चाखण्यासाठी थांबावेही लागेल. पण तोपर्यंत थांबण्याची सहनशक्ती व सबुरी देशातल्या सामान्य माणसाजवळ शिल्लक उरलेली नाही. अशा नैराश्यजनक परिस्थितीत या व्याख्यानांद्वारे 'दिलासा' देण्याचे कार्य डॉ. राज यांनी केले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

**—प्रा. मा. चिं. दीक्षित**

**[ " भारताची आर्थिक उन्नती–" आजवरची कामगिरी आणि भविष्यातील वाटचाल : लेखक–के. एन्. राज : प्रकाशक–समाज प्रबोधन संस्था, पुणे : पाने ५३ : मूल्य रु. १ – २० ]**

## □ एक उपयुक्त आणि वाचनीय प्रकाशन

ऐन मोक्याच्या वेळी 'गोवा स्वातंत्र्याची पाच वर्षे' हे एक विशेष प्रकाशन काढून किर्लोस्कर प्रेसने चांगली कामगिरी केलेली आहे. गोमंतकाच्या विलिनीकरणाची मंगल घटिका जवळ आली असताना गोमंतकाच्या अनेक प्रश्नांविषयी कुतूहल असणाऱ्यांना या अंकात पुरेसे खाद्य तर आहेच, पण त्याचबरोबर विलिनीकरणाविरुद्ध जे जे आक्षेप घेतले जातात त्या सर्व आक्षेपांना समर्पक उत्तरे देण्याचा प्रयत्नही या अंकात आहे. गोव्यातील सार्वमताच्या वेळी या अंकाचा चांगला उपयोग होईल.

गोव्यातील गेल्या पाच वर्षांच्या राजकारणाचा आढावा घेणारी श्री. दत्ता सराफ यांनी घेतलेली श्री. दयानंद बांदोडकर यांची प्रदीर्घ मुलाखत, बांदोडकर मंत्रिमंडळाच्या कामगिरीचे मूल्यमापन करणारा श्री. स. मा. गर्गे यांचा लेख, गोमांतकासाठी झालेल्या स्वातंत्र्यसमराची श्री. सुधाकर अनवलीकर यांनी सांगितलेली बोलकी कथा ही या अंकाची खास वैशिष्टये. त्याचबरोबर गोव्यातील केंद्रशासनाची एका निरीक्षकाने सांगितलेली रडकथा, गोवेकर महाराष्ट्राकडून काय अपेक्षा करतात, याविषयी एका गोवेकरानेच केलेले निवेदन मुद्दाम लक्षात ठेवण्यासारखे आहे. अधून मधून घातलेल्या चौकटी आणि मुबलक छायाचित्रे यांमुळे अंक उठावदार झालेला आहे.

**[ 'गोवा स्वातंत्र्याची पाच वर्षे' : संपादक– मु. शं. किर्लोस्कर : किर्लोस्कर प्रकाशन : किमत पन्नास पैसे : पृष्ठे ५२ ]**

# प्यार . . . प्यार . . . प्यार मोहब्बत

समोवती निळाशार समुद्र पसरलेला. सर्वत्र पाणीच पाणी. अगदी लांबवर नजर फेकली तरीसुद्धा कोठे दूर क्षितिजावरही जमिनीचा तुकडा दिसत नाही. अशा परिस्थितीत एका छोटया होडक्यात नायक-नायिका सापडलेली असतात. भूक, तहानेने अगदी व्याकूळ झालेली असतात बिचारी. नाही म्हणायला निर्मात्याने या अॅडम आणि ईव्हच्या होडक्यात एक अॅपल ठेवलेले असते. पण चिडलेली ईव्ह अॅपल देते पाण्यात फेकून. आता भुकेने मरण्यावाचून दुसरा काही इलाज नव्हता. पण अॅडम मोठा लकबी माणूस असतो. झटकन पाण्यात हात घालतो व एक मासा काढतो. ईव्ह घाबरते. हात झिडकारून टाकते. कसला तरी धक्का बसतो. ईव्ह बेशुद्ध पडते. अॅडम बऱ्याच हाका मारतो. पण छे: ! अखेर निर्मात्यास करुणा येते. पाहता पाहता आकाश भरून येते, धूमधार पाऊस पडू लागतो. अकाली आलेला पाऊस प्रणयभावना घेऊनच येतो. पावसाच्या पाण्याने ईव्ह जागी होते. प्रणयार्त अवस्थेतच. दोघांना अगदी कसेसे व्हायला लागलेले असते. स्वाभाविकच दोघांना गायला होते ! " प्यार मोहब्बतके सिवा ये जिंदगी क्या जिंदगी. "

हा आहे ' प्यार मोहब्बत ' मधील एक प्रसंग. अशा अनेक प्रसंगांनी भरगच्च असा सिनेमा आहे ' प्यार मोहब्बत. ' नुसते प्यार, प्यार आणि प्यार असते तर काही वांधाच नव्हता. कारण देव आनंदच्या मोहक प्रणयक्रीडा पाहण्यासही नाही म्हटले तरी मजा येते. पेईंग गेस्ट, नौ-दो-ग्यारह त्यासाठी तरी आठवावेसे वाटतात. पण मध्यंतरापर्यंत प्रेमाचे नाना चाळे दाखविल्यावर ' प्यार मोहब्बत ' सिनेमातील नाटयाला सुरुवात होते व पिक्चर लांबतलांबत जाते.

त्याचे असे असते की भारतातल्या कोण्या संस्थानाधिपतीचा अशोक नावाचा पुत्र २० वर्षांपूर्वी विलायतला पळून गेलेला असतो. आता भारतातील आपल्या संस्थानची काय हाल आहे ? आईला आपली याद येते किंवा नाही ? बंधुराजांची तब्येत ठीकठाक आहे ना ? हे पाहण्यास परत भारतात यावयास निघतो. बोटीत त्याला भेटतो एक मासलेवाईक बाप व त्याची तऱ्हेवाईक बेटी रीटा. या मुलीस काही मागासलेल्या हिंदुस्थानात परत यायचे नसते. तिला राहायचे असते लंडनमध्येच; तर बापाने तिचे भारतात लग्न पक्के

केलेले असल्याने तिला इकडे आणणे त्याला अत्यंत महत्त्वाचे वाटते. त्यासाठी तो लक्षावधी रुपये द्यावयास तयार असतो. या अशा मुलीवर नजर ठेवण्याची, ती पळून जाणार नाही, याची खबरदारी घेण्याची कामगिरी बाप अशोकवर सोपवितो. ती पळून जाण्याचे अनेक प्रयत्न करते. हा तिच्यावर बरोबर नजर ठेवतो. शेवटी मध्यंतरापर्यंत ती भारतात येऊन पोचतात ती लग्नाच्या आणाभाका घेऊनच. मग मध्यंतरानंतर इकडे संस्थानातले नाटक मार्गी लागते. झाले असते काय की अशोकच्या दिवाणाने गादीवरील मोठ्या भावाचा शिताफीने काटा काढलेला असतो व नामधारी आईच्या नावाने कारभार चालविलेला असतो, सिंहासनारूढ होण्याचेच त्याचे स्वप्न असते. पण मध्येच अशोक येतो. त्याचे कपटनाटक हाणून पाडतो. दोन दिलांचे मिलन होते.

हे कथासूत्र वाचताना जेवढा दम लागतो ना, त्यापेक्षा कितीतरी अधिक थकायला होते ते पडद्यावर पाहताना. एकामागून एक चित्रे पडद्यावर येत असतात, नवनव्या गोष्टींचा खुलासा होत असतो. शेवटी शेवटी वाटते की, खुलासा नाही झाला तरी चालेल पण पिक्चर संपावे.

हा चित्रपट पूर्णांशाने देव आनंदच्या नावावर आहे. उतरत्या तारुण्याला लागलेला हा नौजवान रंगामध्ये भलताच मोहक दिसतो. नाना वेषांत तो पडद्यावर येतो व प्रत्येक वेळी अधिक चांगला, प्रेम करावासा दिसतो. सायराबानूच्या चेहऱ्यावरचे क्लोजअप्स अप्रतिम व रेखीव आहेत. पण तिला स्क्रीन फिगर नसल्याने पूर्णांगाच्या देखाव्यात काहीतरीच लुकडी दिसते. तिच्याकडून अपेक्षा कसलीच नव्हती. त्यामुळे अपेक्षाभंगाचे दु:ख नाही.

बोट भारतात आणीपर्यंत लागणाऱ्या बंदरांचे दर्शन घडविताना छायाचित्रकाराने काही ठिकाणी चांगला कॅमेरा लावला आहे. दिग्दर्शनाच्या व इतर तांत्रिक चुका पोत्याने आहेत. होडके हलते असे दाखविताना कॅमेराच हलविला आहे हे स्पष्ट जाणवते. खवळलेला समुद्र दाखविताना होडीमागे लावलेला पडदा स्पष्ट दिसतो. वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या बोटींचे दर्शन घडते वगैरे.

शंकर-जयकिशनचे संगीत आहे. 'प्यार मोहब्बत' हे विषयगाणे 'दिल तेरा दिवाना है सनम 'च्या ढंगाने घेतले आहे. लता मंगेशकरच्या खुल्या आवाजाची सवय झाल्याने शारदाचा आवाज तोटका, उणा व किनरा वाटतो.

प्यार मोहब्बत १९६६ साली लागून गेला यापेक्षा काहीही महत्त्व या सिनेमाला नाही. एक देव आनंद, सायराबानू, प्रेमनाथ, शशिकला ही गाजलेली मंडळी सोडली तर सर्व बाजू, सर्व दुवे तकलादू आहेत. ●

मराठी चित्रपट

# युगे युगे मी वाट पाहिली

प्रभातच्या उज्ज्वल यशामध्ये पैगंबरवासी एस्. फत्तेलाल यांचा वाटा मोठा आहे. प्रदीर्घ काळानंतर चित्र-निर्मितीस त्यांनी पुन्हा सुरुवात केली. उदय-चित्र या संस्थेतर्फे ' युगे युगे मी वाट पाहिली ' हे चित्र सादर केले. परंतु दुर्दैवाने चित्र रुपेरी पडद्यावर येण्यापूर्वीच फत्तेलाल यांचे देहावसान झाले. त्यांच्या सहकाऱ्यांनी पूर्ण केलेले हे चित्र पाहत असताना एका लोककथेची आठवण येते.

बाप-लेकींमधील संवाद चालू असतो. प्रत्येक मुलीला बाप विचारतो, " बाळ, तू कुणाच्या नशिबाची ? " प्रत्येक कन्या उत्तर देते, " बाबा, मी तुमच्या नशिबाची." सर्वांत धाकटी मात्र सांगते, " बाबा, मी माझ्या नशिबाची. " या उत्तराला प्रति–उत्तर म्हणून बाप या पोरीचे भुकेकंगालाशी लग्न लावतो. स्वतःच्या नशिबाने वाटचाल करणाऱ्या या मुलीचे दिवस फिरतात. संपत्ती आणि ऐश्वर्य तिच्या घरी पाणी भरू लागले. आणि तिकडे बापाची मात्र दुर्दशा झाली.

' युगे युगे ' मधील उमा अशीच दुर्दैवी मुलगी. व्यसनात गुरफटलेला बाप पैशाच्या लोभाने वेडया इनामदाराला पोरगी विकतो. इनामदार जयवंतच्या माल-मत्तेवर प्रत्यक्ष सत्ता त्याच्या काकाची असते. पुतण्याला वेडा ठरवून त्याला एका वाडयात भुकेकंगाल ठेवण्यात येते.

लग्नाच्या पहिल्याच रात्री सुमाला सर्व गोष्टींचा उलगडा होतो. वाटयाला आलेले दुर्दैवी भाग्य स्वीकारण्यासाठी त्याच रात्री सुमा जुन्या वाडयावर जाते व पतीच्या चुलत्याशी झगडून स्वतंत्रपणे उभी राहते. वेडया नवऱ्याला शहाणा करणं एवढा एकच ध्यास सुमाला लागतो. दिराशी प्रेमाचं नाटक करून पतीच्या वेडाचे रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न सुमाकडून सुरू होतो. डोंगर पोखरून उंदीर निघतो. जयवंतच्या वेडामध्ये म्हणण्यासारखे रहस्य नसतेच. तिच्या कपट नाटकाची कल्पना आलेला भैय्या उमावर तिच्याच घरामध्ये अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो. वेडया इनामदाराची सहनशीलता संपते. पत्नीच्या मदतीला धावून जाऊन तो भैय्यापासून तिचा बचाव करतो. इतकं होईपर्यंत दोन तास झालेले असतात.

उरलेल्या अर्ध्या तासामध्ये खलनायकाच्या दुष्कृत्यांना आणखी थोडा वाव देऊन शेवटी उमा व इनामदारांचे गोड मिलन घडवण्यात आलेले आहे.

कथानक तसं मामुली असलं, तरी दिग्दर्शक सी. विश्वनाथ यांनी प्रेक्षकांची उत्सुकता कायम ठेवण्यात यश संपादन केले आहे. 'वेडा इनामदार' शहाणा होणार, हे प्रेक्षकांना माहिती असते. फक्त तो कसा शहाणा होतो याचीच उत्सुकता त्यांना असते आणि याच बाबतीत दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.

पुरुषासारखा पुरुष असणारा इनामदार चुलत्याला व भैय्याला भिऊन लग्नानंतरही वेडाचे सोंग पांघरून राहतो हे पटत नाही. वेडा नवरा पदरी पडलेली सुमा खऱ्या अर्थाने भैय्याच्या मोहात पडते. निदान काही काळ तिच्या मनामध्ये संभ्रम निर्माण होतो, असे दाखवणे स्वाभाविक ठरले असते. परंतु या सर्व घटनांच्या शेवटी हे 'नाटक' असल्याचे दाखवून दिग्दर्शकाने प्रेक्षकांचे समाधान केले असले तरीही सुमाच्या व्यक्तिरेखेच्या वास्तवतेला तडा गेला आहे.

वेडा इनामदार खरंच वेडा असतो. परंतु धर्मपत्नीवर होत असलेल्या अत्याचारांनी त्याला जाण येते असं दाखवलं गेलं असतं तर कदाचित् ते 'हिंदी टाईप' वाटलं असतं हे खरं, परंतु निदान या कथेच्या बाबतीत तरी ते पुष्कळच वास्तव वाटले असते. लाखमोलाच्या मालमत्तेचा तरणाबांड मालक केवळ कुणाला भिऊन 'वेडाचे सोंग' घेईल, ही कल्पनाच विचित्र आहे.

कथा-प्रवाहामध्ये असे मूलभूत दोष असले तरी रुपेरी पडद्यावर कथा सजीव करताना ते प्रखरतेने जाणवणार नाहीत अशी दक्षता घेण्यात आली आहे. सुमाच्या सुखदुःखांशी समरस होऊन जयश्री गडकरने सुमा साकार केली आहे. गजानन जागिरदार (नाना) व चंद्रकांत (भैय्या) यांनी मिळालेल्या संधीचा भरपूर फायदा घेतला आहे. सर्वनाश झाल्यावर नाना वेडे होतात. दोन चार क्लोज अप्स व अन्य शॉटस्‌मधून जागिरदारांनी भावव्यक्तीचे कौशल्य व्यक्त केले आहे. पडद्यावर प्रथमच येणाऱ्या मधुकर गायकवाड (वेडे इनामदार–जयवंत) यांना फारसा वाव नाही. चेहरा समाधानकारक असला तरी अभिनयात मात्र गायकवाड तोटके पडतात.

चित्रपटाची तांत्रिक अंगे फारशी समाधानकारक नाहीत. याला अपवाद म्हणून सेटस्‌चा उल्लेख करावा लागेल. ध्वनिलेखन कमालीचे सदोष आहे. सुमाचे नाव सुमा की उमा हे कळावयास मध्यंतर उजाडते. लवांदे यांच्या छायालेखनामध्ये वाखाणण्यासारखे काही नाही. पाटील व सुमा यांचे प्रथमभेटीतील संवाद संपूर्णपणे 'आऊट सिंक' आहेत. सर्वसाधारण प्रेक्षकांच्या ही लक्षात येईल इतका गलथानपणा या बाबतीत झाला आहे, याचे आश्चर्य वाटले. जयवंतसारख्या पुरुषालाही जे जमले नाही ते करून दाखवणाऱ्या सुमाची ही कथा स्त्री-प्रेक्षकांना काही प्रमाणात रुचेलसे वाटते.

●

–शरद गोखले

# ज्युली ख्रिस्ती

## डार्लिंग डॉ. झिवागो

या वर्षीचे ऑस्कर पारितोषिक आपल्या पहिल्याच चित्रपटातील भूमिकेकरिता मिळवून ज्युली ख्रिस्ती या नवोदित चित्रतारकेने साऱ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला. केवळ योगायोगाने चित्रपटांत चमकण्याची संधी मिळालेल्या ज्युलीने एक विक्रमच करून ठेवला! यंदाचे ऑस्कर ज्युली ख्रिस्तीला देण्यात आल्याचे जेव्हा जाहीर करण्यात आले, तेव्हा ज्युली ख्रिस्तीचे नाव कोणालाच माहीत नव्हते. "ज्युली ख्रिस्ती कोण आहे ?" असाच प्रश्न अनेकांना पडला होता. पण एका रात्रीत प्रसिद्धी संपादन करणाऱ्या ज्युलीने पूर्वी चांगलीच तपश्चर्या केली होती याची कल्पना अनेकांना नसेल. १९४२ साली भारतात ज्युलीचा जन्म झाला. तिचे वडील चहाच्या मळ्यात अधिकारी होते. वयाच्या आठव्या वर्षी तिला शिक्षणाकरिता इंग्लंडला पाठविण्यात आले. शालेय शिक्षण संपविल्यानंतर तिने तीन वर्षांचा नाट्य शिक्षणक्रम पूर्ण केला.

पुढे फॅशनला वाहिलेल्या एका मासिकातील तिचा फोटो जॉन श्लेसिंगर या दिग्दर्शकांच्या नजरेस पडला. तिच्या चेहऱ्यातील आगळेपण त्यांनी अचूक हेरले. तिची गाठ घेऊन आपल्या 'डार्लिंग' या दोन तास चालणाऱ्या चित्रपटात तिला भूमिका देऊ केली. निर्मात्याने ती भूमिका शर्ले मॅक्लीनने करावी म्हणून इच्छा प्रदर्शित केली. परंतु जॉन श्लेसिंगर यांनी आपला हट्ट सोडला नाही. ज्युली ख्रिस्तीसारख्या नवोदितेला घेतल्याबद्दल त्यांना अनेकांनी नावे ठेवली. त्यांच्या निवडीला नाके मुरडली. ज्युलीला या गोष्टीची कल्पना आली. तिने आपला प्राण त्या भूमिकेत ओतला. अविश्रांत श्रम घेतले आणि तिच्या परिश्रमाचे चीज झाले. प्रथम न्यूयॉर्कच्या चित्रपट टीकाकारांचे अॅवॉर्ड तिला मिळाले व पाठोपाठच ऑस्करचा बहुमानही तिच्या वाट्याला आला.

'डार्लिंग' नंतर डेव्हीड लीन या प्रख्यात व कल्पक दिग्दर्शकाने 'डॉ. झिवागो' या आपल्या चित्रपटात तिला भूमिका देऊ केली. ज्युलीला ऑस्कर मिळाल्याने तिच्या 'डॉ. झिवागो' या चित्रपटाकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले. मात्र भारतीय चित्ररसिकांना ज्युली ख्रिस्तीच्या अभिनयाचा आविष्कार पाहावयास मिळणार नाही; कारण, तो चित्रपट प्रदर्शित करण्याबाबत भारत सरकारने निश्चित निर्णय घेतलेला नाही.

— अशोक प्रभाकर आंग्रे

●

# भिंतीच्या तुकड्या

सुधाकर राजे

## □ गाढवाचा माणूसपणा

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे असे म्हणून लोकमान्यांनी केवढा घोटाळा करून ठेवला आहे याची त्यांनाच काय, पण चौपाटीवरच्या त्यांच्या पुतळ्यालाही कल्पना नसेल. माणसाला जन्मसिद्ध अधिकार असतात, असा जोपर्यंत शोध लागला नव्हता तोपर्यंत सारे कसे सुरळीत चालले होते. पण आता सगळेच बदलले. आता निरनिराळ्या प्रकारची माणसे निरनिराळे जन्मसिद्ध हक्क मागू लागली आहेत. कारकून खुर्चीवर टोपी ठेवून ऑफिसच्या कँटिनमध्ये दिवस काढायचा अधिकार मागू लागले. दैनिकांचे संपादक हिटलरचे नेमके कुठे चुकले किंवा पंचवार्षिक योजनेच्या यशाची एकमेव गुरुकिल्ली कशात आहे, हे केवळ आपल्यालाच माहीत असलेले गुपित जनतेच्या कल्याणासाठी उघडे करायचा अधिकार मागू लागले. मासिकांचे लोकप्रिय लेखक 'उघडकीला न आलेले वाङ्मयचौर्य म्हणजेच स्वतंत्र साहित्य' या तत्त्वाला अनुसरून रद्दीत घेतलेल्या इंग्रजी कथा-मासिकांतून प्रतिभा-साधन करायचा अधिकार मागू लागले. कॉलेजयुवक सैरावैराबानूवर सांघिक प्रेम करण्याचा अधिकार मागू लागले, तर ऑफिसात जाणाऱ्या मुली स्वेटर विणण्यासाठी ऑफिसनेच लोकरीचे गुंडे पुरवले पाहिजेत म्हणून आंदोलन करू लागल्या आहेत. कमाल अशी की, अधिकार म्हणजे काय याची पुसटदेखील कल्पना नसलेला नवरा नामक तथाकथित माणूसही 'आवडतीचे पण मीठ खारट असू शकते' असे हळूच, चाचरत' पण ऐकू जाईल, अशा बेताने बोलून दाखवायचा अधिकार मागू लागला.

एवढ्यावरच हा अधिकारांचा अनधिकृत गोंधळ संपला का? छे: ! आता दिल्लीतल्या एका आंतरराष्ट्रीय धार्मिक संस्थेने थेट यूनोला खलिता पाठविला आहे की जनावरांच्याही मूलभूत अधिकारांची यादी देणारे आज्ञापत्र तयार करण्यात आले. भले शाबास ! कारकून व नवरेदेखील मूलभूत हक्कांची मागणी करू लागले आहेत, एवढे एकदा म्हटल्यावर जनावरांच्या अधिकारांची वेगळी मागणी करायची काही आवश्यकता होती का ? पण नाही. आता प्रत्येक जनावराला वेगवेगळे मूलभूत अधिकार ठरवून द्यायचा गाढवपणा करायला हवा.

गाढवापासून सुरुवात करायची म्हटली तर गाढवाचा मूलभूत अधिकार कोणता? उत्तर सोपे आहे. एखाद्या गाढवाने फारच गाढवपणा केला तर, "काय माणूस आहेस!" अशी त्याला शिवी हासडण्याचा तमाम गाढव समाजाला मूलाधिकार द्यावा

लागेल. बैलोबांच्या जोड्या म्हणतील, निवडणुकीच्या या मोसमात आम्हांला कॉंग्रेसचे इतके काम असते की शेतावरून अर्न्ड लीव्ह घेण्याचा आम्हांला हक्क असावा. कुत्रे म्हणतील, लांगूलचालन हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो निवडणुकीचे तिकीट हवे असणाऱ्या उमेदवारांनी पक्षप्रमुखाकडे जाताना आमच्याकडून हिरावून घेता कामा नये. मांजर म्हणेल, माझ्या चालण्याच्या स्टाईलवर माझा कॉपीराईट आहे. तो कुठल्याही नटीने कुठल्याही हिंदी सिनेमात कुठल्याही रंगाची जीन घातलेली असली तरी चोरता कामा नये. उंदीर म्हणतील, हिंदुस्थानात माणसांच्या सहापट मूषक आहेत, तेव्हा पी. एल्. ४८० गहू माणसांच्या सहापट आम्हांला मिळाला पाहिजे. शेळयामेंढया म्हणतील, हिंदुस्थानातल्या आम जनतेने आमचा सोशिकपणा कित्येक वर्षे उसना घेतला आहे तो परत करून माणसांनी माणसासारखे वागावे. शेवटीं हत्ती गजगतीने येतील अन् म्हणतील, पांढऱ्या हत्तींप्रमाणे काळे हत्तीदेखील हिंदुस्थानचे अँबॅसॅडर व्हायला लायक आहेत, हे पंडित नेहरूंनी दोन-तीनदा दाखवले होते, तेव्हा कुठचा हत्ती कुठल्या देशात वकील म्हणून पाठविता येईल हे ठरविण्यासाठी भारताचे पंतप्रधान आणि सर्कशीचे रिंगमास्तर यांची एक समिती ताबडतोब नेमण्यात यावी. एकूण काय, डार्विन म्हणतो, माकडाचा माणूस झाला, पण मी म्हणतो माणसाचे माकड झाल्याखेरीज आता तरणोपाय दिसत नाही.

## □ संपादकीय वासरू

तमाम मराठी जिल्हा-वर्तमानपत्रांच्या उपसंपादकांची मी जाहीर माफी मागतो. ही मंडळी दर दिवसाआड दोन डोक्यांचे वासरू, चार डोळयांचे शिंगरू, शिंग असलेले मूल, शिंग नसलेला मंत्री इत्यादी सरस आणि चमत्कारिक गोष्टी सांगून रसिकांचे मन रिझवीत असतात. त्यांच्या या कल्पनाचातुर्याचे मला मात्र आतापर्यंत कधीच कौतुक वाटले नव्हते. पण नुकतेच एका इंग्रजी पेपरात वाचले की घानाची राजधानी आक्रा येथे एक माणूस दारूच्या नशेत एका कुत्र्याला चावला– अन् कुत्रा मेला. छी, छी, काय हे ढळढळीत कल्पनाचौर्य ! या बातमीची कल्पना प्रस्तुत पेपराच्या संपादकाने कुठल्या तरी मराठी जिल्हा पत्रांतूनच आणली असली पाहिजे, यात मला तिळमात्र शंका वाटत नाही. एरवी राजीखुशीने, नशापाणी न करता सुखाने कुत्र्याचे जिणे जगणारा हा कुत्रा माणसाच्या मौतीने कशाल मेला असता ? शिवाय माणसे चावे काढतात ते एकमेकांचे, अन् तेही निवडणुकीच्या मोसमात. तेव्हा तो कुत्रा कुठल्या पक्षाचा आहे याची शहानिशा न करताच हा माणूस त्याला चावला हे नवल नाही का ? याचा सरळ अर्थ म्हणजे इंग्रजी पेपरांना अजून हे अस्सल मराठी तंत्र जमलेले नाही. तरीदेखील हे असले गर्हणीय कल्पनाचौर्य पसरू द्यायचे नसेल तर मराठी वर्तमानपत्रांनी सर्व दोन डोक्यांच्या वासरांवर व चार डोळयांच्या शिंगरांवर आपला राखीव हक्क असल्याचे ताबडतोब जाहीर करावे. ●

# राशीभविष्य : श्री. गो. जोशी : सायनाचार्य, नासिक

ता. ७ ते १३ जानेवारी १९६७

## भारतीय राजसत्तेचा दुबळेपणा

श्री. फत्तेसिंगांच्या आत्मदहनाच्या रेटचापुढे भारतीय राजसत्तेला शेवटी नमावे लागले. या घटनेमुळे शीख जमात आणि भारतीय राजसत्ता या दोघांचेही पितळ उघडे पडले. फत्तेसिंगांच्या धमकावणीचा जोर किती नकली आहे व राजसत्तेचा खंबीरपणा किती लवचीक आहे याची जाणीव जगाला झाली.

श्री शंकराचार्यांच्या उपोषणामुळेही गोवधबंदीवर समाधानकारक पर्याय सुचवावाच लागेल. थोडक्यात राजसत्तेच्या खंबीरपणाला श्री. फत्तेसिंगांनी व श्री शंकराचार्यांनी सुरूंग लावले आणि त्यामुळे तटबंदी ढासळली नाही तरी ती निश्चितच कमजोर झाली.

इकडे बंडखोर काँग्रेसवाल्यांनीही काँग्रेसला दाती तृण धरावयास लावण्याचा चंगच बांधलाय ! शेवटी काँग्रेसमधील अंतर्गत दुहीच काँग्रेसच्या अधःपाताला कारण ठरायची. काँग्रेसच्या मकर राशीच्या चतुर्थात राहूचा धिंगाणा सुरू असल्यामुळे ही अंतर्गत अशांतता विकोपास गेली.

**मेष** :– भाग्यातील सूर्य–बुध, बाराव्या शनीची तमा न बाळगता तुमचा प्रगतमार्ग निष्कंटक बनवतील. हा आठवडाच नव्हे तर आगामी १५-२० दिवसांचा काल तुमचे चारित्र्य गतिमान बनवील.

हा आठवडा खूपच धाईगर्दीचा जाणवेल, सांस्कृतिक कार्यक्रमांत हिरीरीने भाग घ्यावा लागेल. निवडणुकीचे क्षेत्र गाजवावे लागेल.

या जानेवारी महिन्यापासून आपल्या चारित्र्याला वेगळीच धार चढेल, आपल्यातील सुप्त कर्तृत्व उफाळून येईल, तुमचे विरोधक तुमच्या आसपासही फिरकू शकणार नाहीत. शैक्षणिक व संशोधनात्मक क्षेत्रांत तर सदैव आघाडीवर राहाल.

दि. ९ ते ११ हा काळ खूपच धावपळीचा जाणवेल.

**वृषभ :–** शुक्राशी तुमचे सर्वांत जवळचे नाते. तो भाग्यस्थानी आल्यामुळे तुमचा उत्साह शतपटीने वाढेल. चारित्र्य कृतार्थ बनेल. या वेळी आणि यापुढेही वृषभराशी व्यक्तींनी सतत आघाडीवरच राहावे अशी नियतीची इच्छा दिसते.

या वेळी आपण प्रयत्नांची शिकस्त करून अनेक कार्यक्षेत्रे गाजवाल. वैज्ञानिक क्षेत्रांत, साहित्याच्या प्रांतात आवाज उठवाल. प्रवास, स्थानांतर, बदल यांपैकी काहीही केव्हाही घडू शकेल. या वेळचा गुरु–शनी त्रिकोण आपल्या आजवरच्या साऱ्या असफल• आशाआकांक्षा सफल करू शकेल. दि. ११ ते १३ या कालखंडावर सारे लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :–** तुमच्या चौथ्या मंगळाचा खडतर काल संपल्यासारखाच आहे. आता तुमच्या नव्या कल्पना, नव्या योजना आकार घेऊ लागतील. वैचारिक संघर्ष मिटू लागेल. स्थगित कार्ये गती घेऊ लागतील. अनारोग्याच्या विवंचना कायमच्या मिटू शकतील. गेल्या महिन्याभरात तुम्ही जग पछाडले, अपार परिश्रम केलेत तरी अपेक्षेप्रमाणे फारसे घडले नसेल. आता सर्व काही, अपेक्षेपेक्षाही चांगले घडून यावे.

शैक्षणिक व वैज्ञानिक क्षेत्रांत नाव घेण्यासारखे काम करून दाखवाल. राजकीय विरोध संपुष्टांत यायला लागेल. सांसारिक जीवनात तर अनेक अत्यानंदाच्या घटना घडून यायला लागतील. तुमचा अनिष्टकाल संपल्यासारखाच आहे. दि. ९ ते ११ विशेष अनुकूल दिवस.

**कर्क :–** तुम्हा कर्कराशी व्यक्तींबद्दल सांगावे तितके थोडेच आहे. एकाच वाक्यात सांगतो, तुम्ही काहीही करा, कुठेही जा तुमच्यावर खूष असलेले ग्रह तुमच्या प्रत्येक कार्यात अपेक्षेबाहेर यश देऊन जातील. प्रतिष्ठा उंचावेल, चारित्र्य उज्ज्वल बनेल, अधिकाराचे स्थान तुमच्यासाठी राखून ठेवले जाईल. तुमच्या राशीतील वक्री गुरू म्हणजे महन्मांगल्याचं प्रतीकच !

सामाजिक क्षेत्र हेच तुमचं कार्यक्षेत्र. त्या क्षेत्रात तुमच्या यशोदुंदुभी सर्वत्र निनादू लागतील. व्यावसायिक यश तर घे घे म्हणून पाठीशी लागेल, २० वर्षांनंतर लाभलेला हा गुरु-शनी त्रिकोण तुम्हांला साफल्याचा जाणवेल.

दि. ११ ते १३ सर्वोत्तम काल.

**सिंह :–** सूर्य-बुधांची कृपा ज्यांच्यावर झाली त्यांना अन्य कोणत्याही अनिष्ट ग्रहांची डर नाही. आता तुमच्या सिंह गर्जनांनी दशदिशा दणाणून जातील. विरोधक, प्रतिस्पर्धी डोकं वर काढू शकणार नाहीत. निर्भयपणे पुढे व्हा, तुमचे सर्वत्र स्वागत घडेल.

अंगीकृत व्यवसायांत, राजकीय क्षेत्रांत आवाज उठवाल. नवे क्षेत्र शोधून काढाल, प्रगतीच्या नव्या वाटांनी मार्गक्रमण करू लागाल. लवकरच मंगळसारखा एक कर्तृत्वशाली ग्रह तुमच्या पराक्रमस्थानी येणार आहे. त्याची प्रसादचिन्हे आतापासूनच दिसायला लागतील.

पैसा बराच हाती येईल, प्रतिष्ठा अपेक्षेबाहेर उंचावेल. निवडणुकीच्या क्षेत्रात तर तुम्हांला प्रतिस्पर्धीच उरणार नाही.

दि. १० ते १२ या काळावर सारे लक्ष केंद्रित करा.

कन्या :– सूर्य चौथा असो किंवा मंगळ अनिष्ट असो–एकादश गुरूचे वरदान लाभलेल्यांना कुणाचीही पर्वा करण्याचे कारण नाही. तुमची प्रगती कोणीही रोख शकणार नाही.

या जानेवारी महिन्यापासूनच तुमचे व्यक्तिमत्त्व आकर्षक बनू लागेल. परिस्थितीशी दोन हात करावे लागले तर करा पण माघार म्हणून घेऊ नका. अपयशाचा डाग चुकूनही लागू शकणार नाही.

व्यावसायिक वातावरण सुधारेल. भंगलेल्या आशाआकांक्षा सांधल्या जातील. राजकीय वर्तुळांत तुमचे महत्त्व बरेच वाढू लागेल.

बढती-बदलीचे योग दिसू लागतील, नव्या योजना आकार घेऊ लागतील. नोंद करण्यासारखा काल ११ ते १३ जानेवारी हाच होय.

तूळ :– मंगळ कन्येतून तुळेत गेला की तूळराशी व्यक्तींचे नष्टचर्य संपले. पण ही गणिती भाषा झाली. अंतरिक्षात काही दोन राशींमध्ये पडदे असत नाहीत, यामुळे ग्रहांच्या राश्यंतराची कित्येक दिवस आधीपासूनच जाणीव व्हायला लागते. मानवी कायदा ग्रह मानीत नाहींत.

मंगळाच्या अनुकूलतेची आतापासूनच आपणांस जाणीव व्हायला लागेल. ती तूळेत गेल्यासारखाच आपणांस वाटू लागेल.

या आठवड्यापासून स्थगित कार्यात गती मिळू लागेल. वैचारिक संघर्ष मिटून परस्परांत दिलजमाई होऊ लागेल. सारी स्थगित कामे गती घेऊ लागतील. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत तुमचे नाव सर्वांच्या मुखी गाजू लागेल. प्रगतीच्या नव्या वाटाही दृष्टिक्षेपात याव्यात.

दि. १० ते १२ हा काळ अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

वृश्चिक :– राशीचे सारेच काही लोकोत्तर व अनन्यसाधारण आणि या वेळच्या भाग्यस्थ गुरूने त्या तुमच्या नैसर्गिक गुणवैशिष्ट्यांना प्रचंड उठाव द्यायचे ठरविलेले दिसते. तुमचा प्रांत वेगळा, तुमचे चारित्र्यही आदर्श. या वेळी आपण सहज पाऊल टाकाल ते पवित्र्यातच पडेल.

एकादशांतील हर्षल हे तर निसर्गाकडून लाभलेले वरदानच. जगाने तुमचा हेवा करावा असे काही या वेळी घडून यावे. अनपेक्षितपणे फार मोठे लाभ उठवू शकाल, सामाजिक क्षेत्रातील उच्चस्थान मिळवाल. राजकीय क्षेत्रात तुम्हांला प्रतिस्पर्धीच उरणार नाही. जाल तिथे स्वागत घडेल. कराल ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. प्रवास घडावा. राष्ट्रीय कार्यक्रमात आघाडीचे स्थान लाभेल.

दि. ११ ते १३ सर्वकाही मनाप्रमाणे घडून यायला लागेल.

**धनू** :– तुम्हां धनुराशी व्यक्तींबद्दल मला जरा सांभाळूनच लिहावे लागते. या वेळी रवि-शुक्रांचे साहाय्य तुम्हांला लाभत असूनसुद्धा, तुमच्या व्यावसायिक तट-बंदीला गुरु–शनींनी सुरुंग लावलेले असल्यामुळे, कोणत्या क्षणी काय होईल हे सांगताच येणार नाही. तसे काही न होवो एवढी सदिच्छा व्यक्त करण्याशिवाय माझ्या हातांत दुसरे काय आहे ?

व्यवसायधंद्यांत जरा जपूनच पावले टाका, निवडणुकीच्या क्षेत्रात कुणालाही आव्हान देणे किंवा आवाहन करणे या दोन्हीही गोष्टी टाळा. प्रयत्नांची शिकस्त केलीत, विजय मिळावा म्हणून जिवाचे रान केलेत तरच थोडेफार आशादायक वातावरण निर्माण होईल. तुमच्या नेहमीच्या देमार प्रवृत्तीला या वेळी आळा घाला-यला हवा.

**मकर** :– या वेळी अनेक ग्रह तुमच्यावर खूष आहेत. पण एकटा भाग्यातील हर्षलसुद्धा तुमच्या चारित्र्याला उत्थान द्यायला पुरेसा आहे. या कालाचे महत्त्वच असे आहे की या वेळी तुम्हांला हवं ते हवं तेव्हा मिळू शकेल. कधी स्वप्नातही नाही अशा अनेक अनुकूल घटना एकाएकी घडून यायला लागतील. प्रगतीची एक वेगळी पाऊलवाट गवसेल. साऱ्या जगाने तुमचा हेवा करावा असं काही तरी भव्यदिव्य आपल्या हातून घडेल.

अनपेक्षितपणे बढती–बदली. परदेश प्रवास. चिरंतन स्मृतीच्या अनेक प्रकट घटना याव्यात असेच या कालाचे माहात्म्य आहे. दि. ८–११–१३ या कालाची नोंद करा.

**कुंभ** :– सूर्य-बुध एकादशात असेपर्यंत तुम्हांला शनि-मंगळाची डर नाही. या वेळी तरी निदान कोणताच ग्रह तुमच्या वाटेस जाण्यास धजणार नाही–थोडेफार जपा-यला हवे. प्रकृतीला सभोवतालचे वातावरण अनुकूल दिसू लागेल. व्यवसाय-धंद्याचे क्षेत्र विस्तृत व विशाल बनू लागेल. दि. २२ पर्यंत फारसे धाडस–साहस करू नका.

या कालात अनेकांचे सहकार्य लाभेल, इष्टमित्रांच्या सहकार्याचा प्रत्यय येऊ लागेल. प्रवास बदल, स्थानांतर यांपैकी काहीही घडेल.

दि. ९ ते १३ या काली अनंत चांगल्या घटना घडतील.

**मीन** :– अनेक विशाल ग्रह दशम-एकादशांतून संचारत आहेत. क्षणभर साडे-सातीचा विसर पडावा असे वातावरण निर्माण होईल, वरिष्ठांची कृपा, इष्टमित्रांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल आणि त्यामुळे अपेक्षाभंगाचा प्रसंग सहसा कुठच येणार नाही.

प्रकृती आणि पैसा या बाबतीत थोडाफार ताण बसायचाच. साडेसातीत एवढे न घडले तरच नवल !

हा आठवडा व आगामी १५–२० दिवसांचा काल अपेक्षासाफल्याचा जाणवेल. धनोत्पादनाचे नवनवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. प्रगतीकडे वेगाने वाट-चाल होऊ लागेल. दि. ८–११–१२ अनेक लाभ पदरी पडावेत. ●

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**